नावल व नाटक

ह्यांविषयीं निबंध

(An Essay on the nature of a novel & a drama)

लेखक

काशिनाथ बाळकृष्ण मराठे, बी. ए.

V891·4609
Mar/Nav
29673

बुक डेपो प्रकाशन

THE LIBRARY

S. N. D. T.
WOMEN'S UNIVERSITY
BOMBAY.

S. N. D. T. WOMEN'S UNIVERSITY
LIBRARY.

नावल व नाटक ह्यांविषयीं निबंध

AN ESSAY
ON THE NATURE OF A NOVEL AND A DRAMA
READ BEFORE THE DNYANA PRASARAK
ASSOCIATION OF BOMBAY

By
KASHINATH BALKRISHNA MARATHE, B. A.

मुंबईंतील ज्ञानप्रसारक सभेपुढें
काशीनाथ बाळकृष्ण मराठे
ह्यांनीं
ता. १६ फेब्रुआरी सन १८७२ ई० रोजीं वाचला.

23673

मे १९६२ किंमत १ रुपया

मॉडर्न बुकडेपो प्रकाशन

OCT 1969

प्रकाशक : श्री. कमलाबाई भिडे, मालक,
मॉडर्न बुकडेपो, बाजीराव रस्ता, पुणें २.

पहिली आवृत्ति
दुसरी आवृत्ति

मुद्रक : सौ. उषा ज. नागपूरकर
श्री मुद्रण मंदिर, ५८० सदाशिव पेठ,
पुणें २.

मूळ लेखकाची प्रस्तावना

।निबंध फेब्रुआरी महिन्यांत ज्ञानप्रसारक सभेपुढें वाचला. त्या जानें हा निबंध लिहिण्यास उत्तेजन दिलें, व निबंधाचा स्वीकार ›द्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. हा निबंध छापविण्याचें कारण भाहे कीं कैलासवासी रा. ब. विष्णु परशुराम रानडे ह्यांनीं एकवार भेप्राय दर्शविला होता कीं प्रस्तुत * नावलें लिहिणारे व नाटकें फार झाले आहेत; त्यांपैकीं पुष्कळांस नावल अथवा नाटक कसें, हें देखील माहित नसतें, त्यामुळें ते हव्या त्या प्रकारची भाषा ।, हव्या तशा कल्पना पुस्तकांतून घालतात, व हवा तितका सत्याचा करितात. असें होऊं नये म्हणून कोणी तरी चांगल्या विद्वानानें नावल ह्यांच्या स्वरूपाविषयीं निबंध लिहावा, व तो छापून प्रसिद्ध करावा. विष्णुपंतांनीं हा अभिप्राय दोन तीन चांगल्या विद्वानांस कळवला, णाच्याही हातून ती गोष्ट झाली नाहीं; म्हणून पुढील अल्पविद्वानाचा छापण्यांत आला. त्यांत न्यूनता पुष्कळ असतील, परंतु कांहीं माहिती निबंधांतून व संस्कृत ग्रंथांतून घेतली आहे ती ह्यापुढें नावल कर- अथवा नाटक लिहिणाऱ्यांस उपयोगी पडेल अशी निबंधकर्त्याची भाहे.

' नावल ' ह्या शब्दाचें कादंबरी अथवा दुसऱ्या कोणत्याहि शब्दानें भाषांतर होत नाहीं म्हणून नावल हाच शब्द ठेविला आहे.

PREFACE

Numberless writers of stories are at present pushing forward for the fame of authors, and trying to make up one department of Marathi Literature: Novels and Dramas, or *light literature* as they are popularly called. I believe all educated people will agree with me in saying that not even one in a hundred of these writers is acquainted with the principles and rules which guide the pen of a European Novelist or Dramatist in his pictures of *real life*. There is none yet who promises to aspire to the fame of the great Scott or Shakespeare of Great Britain, or the great Kalidasa of India. I regret the absence of any such, not because it is impossible to have such men in India, but because our educated young men do not make an earnest effort to write good novels and dramas. I have every hope that India, after receiving more light from the West, will produce many Scotts and Shakespeares. This land of the immortal Kalidas can bring forth any number of Novelists or Dramatists, provided the circumstances are favourable. At the present day the circumstances are not perfectly favourable, although the British Government has given us the most peaceful and quiet time, and the public is gradually learning to appreciate superior literature. One great impediment to the cultivation of literature is the excessive passion for Government service. There are men, even now, who have enough of wit and learning to make them respectable authors. A man like Mr. Vinayaka Janardan Kirtane, the author of the drama of "Madhavarao" who has abundant wit and information, should try to labour as a Novelist or Dramatist. But no: the all-engrossing fondness for Government service will not leave our Marathas free for the pure and sublime purposes of extending the literature of their Vernacular, and of conferring a blessing on their own people. The existing stock of Novels and

Dramas will do no good to the reading public. Some of them are on the contrary very mischievous. How they are mischievous, and what important defects the best of them have, I have shown in the following essay. Some of the fundamental principles of Novel-writing inculcated by me I have borrowed from the essays of Adison, Scott and Macaulay ; and some others have been taken from the science of Alankāra (good composition) in Sanskrit. All friends of reform are therefore requested to peruse my humble remarks in the following essay, and to devote their best energies towards giving pure specimens of Marathi Novels and Dramas, so as to reform or to displace the various imperfect and unrefined compositions that the Printing Presses in the Marātha country turn out every day, by means of their own superior works.

K. B. M.

Bombay, 1st August 1872.

प्रकाशकांचें निवेदन

इ. स. १८३५ ते इ. स. १८७४ या काळांत प्रसिद्ध झालेला ह
पहिला व एकमेव वाङ्मयविषयक निबंध असल्यामुळें त्याला एक प्रकारं
ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें आहे. या काळांत तत्कालीन स्थितीविषयी
राजकीय व सामाजिक विषयांवर, आणि नीतिविषयक प्रश्नांवर विवि
चर्चात्मक निबंध लिहिले गेले. हिंदुस्थानची प्राचीन व सांप्रतची स्थिति
सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध (विष्णुबावा ब्रह्मचारी) हिंदु लोकांच्
मध्यंतरीय अवस्थेविषयीं विचार, दारूपासून अनर्थ, सत्यनिरूपण, स्वदेशा
भिमान, हिंदु लोकांच्या सणाविषयीं निबंध, कुटुंब-सुधारणा, अशीं सुमा
५० निबंधात्मक पुस्तकें या ४० वर्षांत निघालीं; त्याचप्रमाणें सुमारें १०
कादंबऱ्या व ५० नाटकें प्रसिद्ध झालीं; पण कादंबरी व नाटक यांच्य
स्वरूपाची चर्चा करणारा, वाङ्मयीन टीकेचा एकहि निबंध कोणी लिहिल
नाहीं. तत्कालीन विद्वान् कै. रा. ब. विष्णु परशुराम रानडे यांनीं अनेकवा
जाहीरपणें सुचवूनहि या विषयावर कोणी निबंध लिहिण्यास पुढें आला नाह
म्हणून कै. रा. ब. काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांनीं हा निबंध लिहू
तो प्रथम ता. १६-२-१८७२ रोजीं मुंबईच्या ज्ञानप्रसारक सभेपुढें वाचला
व सभेनें त्याचा पुरस्कार केल्यावरून तो पुढें छापण्यांत आला. 'सध्यां नावं
लिहिणारे व नाटकें लिहिणारे फार झाले आहेत; त्यांपैकीं पुष्कळांस नावत
अथवा नाटक असावें कसें, हें देखील माहीत नसतें. म्हणून कोणातरं
चांगल्या विद्वानानें नावल व नाटक यांच्या स्वरूपाविषयीं निबंध लिहावा
अशी कै. रानडे यांनीं जाहीर विनंति केली होती. त्या विनंतीप्रमाणें कोणीन
तसा प्रयत्न केल्याचें दिसून न आल्यामुळें कै. मराठे यांनीं हा वाङ्मयविषय
निबंध लिहून तयार केला.

कै. मराठे यांनीं हा निबंध लिहिला त्या वेळीं त्यांचें वय फक्त २८ वर्षां
होतें; व ते बी. ए. झालेले होते. त्यानंतर ते एलूएल्. बी. झाले. य
निबंधाच्या इंग्रजी प्रस्तावनेंत कै. मराठे यांनीं अशी तक्रार केली आहे कीं
सध्यांचे सुशिक्षित तरुण सरकारी नोकरीच्या फंदांत सांपडल्यामुळें त्यांच्
हातून उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिति होत नाहीं. या लोकांनीं जर मनावर घेत

र मराठींत त्यांना उत्तमोत्तम रचना करतां येईल. सध्यां प्रसिद्ध होणाऱ्या ादंबऱ्या व नाटकें समाजाला उपयुक्त नाहींत, इतकेंच नव्हे तर अधोगतीला णारीं आहेत. आणि चांगलें वाङ्मय निर्माण व्हावें म्हणूनच त्यांतील ोषांचें दिग्दर्शन केलें आहे, असें या प्रस्तावनेंत लेखकानें म्हटलें आहे. रकारी नोकरीचा व्यामोह हा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीच्या आड येत असल्यामुळें ुशिक्षित तरुणांनीं त्या मोहांत पडूं नये, असा इषारा कै. मराठे यांनीं या स्तावनेंत दिला आहे, पण पुढें खुद्द मराठेच सरकारी नोकरींत शिरले, थापि सरकारी नोकरी त्यांच्या वाङ्मयनिर्मितीच्या आड आली नाहीं, हें ांगेंण अवश्य वाटते.

मराठी भाषेंत यापूर्वीं असा वाङ्मयीन चर्चेचा निबंध प्रसिद्ध झाल्याचें ाढळत नाहीं. कादंबरीकार व नाटककर्ते यांनीं ग्रंथरचना करतांना ामान्यतः कोणत्या गोष्टी ध्यानांत ठेवल्या पाहिजेत, कोणत्या पद्धतीनें ापल्या ग्रंथांची रचना केली पाहिजे व कोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजेत, ाचें सोदाहरण विवेचन कै. मराठे यांनीं या छोट्या पुस्तकांत केलें आहे. ाचप्रमाणें समकालीन कादंबऱ्या व नाटकें यांचीं उदाहरणें घेऊन त्यांतील ाषाशैली, कथानक, मांडणी वगैरेसंबंधींच्या दोषांचेंहि त्यांनीं स्पष्टपणें दिग्दर्शन केलें आहे. मराठींत अशा प्रकारचा हा पहिलाच प्रबंध आहे. आणि गेल्या ८०-९० वर्षांत साहित्यविषयक चर्चेंत व वाङ्मयीन टीकालेखांत ाचा इतक्या वेळां उल्लेख झाला आहे कीं, हा मूळ निबंध आहे तरी काय शी जिज्ञासा अनेक अभ्यासकांना झाली असल्यास आश्चर्य नाहीं. आणि ा जिज्ञासूंच्या समाधानासाठींच आम्ही या दुर्मिळ प्रबंधाचें पुनर्मुद्रण करीत आहों. १८७२ सालीं प्रथम प्रकाशित झालेला हा निबंध आज ९० वर्षांनीं सऱ्यांदा प्रसिद्ध होत आहे. यावरून कै. मराठे यांच्या वारसांचें, मराठी काशकांचें व मराठी साहित्यसंस्थांचें या आद्य वाङ्मयीन निबंधाकडे कसें लक्ष झालें हें कळून खेद वाटतो.

कै. रा. ब. का. बा. मराठे यांनीं आपल्या या निबंधांत इंग्रजी 'नॉव्हेल' ा शब्दासाठीं 'नावल' हा शब्द उपयोजिला आहे. त्यांच्या मतें या ब्दाचें कादंबरी अथवा दुसऱ्या कोणत्याहि शब्दानें बरोबर भाषांतर होत ाहीं. त्यांच्या मतें 'नावल म्हणजे चमत्कारिक गोष्ट किंवा नवलसमूह.'

मराठी भाषेंत त्या वेळीं कादंबरी हा शब्द रूढ झालेला होता, पण
मराठ्यांना मान्य झाला नाहीं. म्हणून त्यांनीं इंग्रजीच्या आधारें स्वतः
नवीन शब्द टांकसाळींतून पाडला. पण दुर्दैवानें हा शब्द कोणाला रुच
नाहीं असें दिसतें. कारण त्यानंतर पुढें तो कोणीच उपयोगांत आणला नाह
त्यांच्या हयातींतच तो नामशेष झाला.

आम्ही गेल्या तीन वर्षांत ' मुक्तामाला ', ' मंजुघोषा ' व ' अथेल्लो
या शंभर वर्षांपूर्वींच्या तीन जुन्या, दुर्मिळ पण उत्कृष्ट पुस्तकांचें पुनर्मुद्र
केलें. त्याच मालिकेंत कै. रा. ब. का. बा. मराठे यांचा " नावल व नाट
ह्याविषयीं निबंध " हा नव्वद वर्षांपूर्वीं प्रथम प्रकाशित झालेला आणि
एकदांहि पुनरावृत्तीचा योग न लाभलेला निबंध, सहज समाविष्ट होण्यासार
असल्यामुळें आम्ही तो कै. मराठे यांच्या वारसांच्या परवानगीनें प्रसि
करीत आहों. मराठी वाङ्मयीन टीका व साहित्यविषयक चर्चा या दृष्ट
मराठीच्या अभ्यासकांना हा निबंध उपयुक्त व उद्बोधक वाटेल अशी आ
आहे. या पुस्तकाच्या कामीं आम्हांला ' मराठी ग्रंथसूचि 'कर्ते श्र
शं. ग. दाते यांचें जें बहुमोल सहाय्य झालें त्याबद्दल त्यांचे विशेष आभ
मानले पाहिजेत. कै. मराठे यांचा फोटो व चरित्र त्यांच्या वारसांकडू
आम्हांस उपलब्ध झालें त्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहों.

पुणें, ता. १-५-१९६२ प्रकाशक

जन्म : १६ जुलै १८४४] कै. का. वा. मराठे [मृत्यु : १३ नोव्हेंबर १९१

कै. का. बा. मराठे यांचें चरित्र

"नावल व नाटक ह्याविषयीं निबंध" या पुस्तकाचे कर्ते काशीनाथ बाळकृष्ण मराठे हे मोठे विद्वान् पुरुष होऊन गेले. ग्रंथकार, साक्षेपी भाषांतरकार व विचारवंत म्हणून त्यांचें नांव त्या काळांत विशेष गाजलें होतें. त्यांनीं उपनिषदांचे जसें मराठी भाषांतर केलें, अनेक इंग्रजी शास्त्रीय पुस्तकांचा मराठी अनुवाद केला, त्याप्रमाणें तुकारामाच्या अभंगांचें इंग्रजी भाषांतर केलें. त्यांचा वेदान्तविषयाचा दांडगा व्यासंग होता. त्यांचीं रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, जीवनेंद्रियशास्त्र इत्यादि शास्त्रीय विषयांवरील पुस्तकें सरकारनें प्रसिद्ध केलीं.

काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांचा जन्म ता. १६-६-१८८४ रोजीं एका प्रतिष्ठित घराण्यांत पुणें येथें झाला. त्यांचे वडील बाळकृष्ण अनंत हे शास्त्री होते; व पुण्यास ताई रास्ते राममंदिरांत पुराण सांगत असत. त्यांची परिस्थिति अगदीं सामान्य होती. इतकी कीं, त्यांना आपल्या मुलाला शाळेंत घालणेंहि शक्य झालें नाहीं. वयाच्या १४ व्या वर्षांपर्यंत काशीनाथपंतांचें शिक्षण घरींच झालें. अखेर १५ व्या वर्षीं पुण्याच्या सरकारी शाळेंत नादार विद्यार्थी म्हणून त्यांचा प्रवेश झाला. त्यांची बुद्धि प्रथमपासून तल्लख आणि त्यांत घरच्या संस्कृत शिक्षणाचे उत्तम संस्कार झालेले, त्यामुळें पाठशाळेंत पहिल्याच वर्षीं त्यांनीं संस्कृतची शिष्यवृत्ति मिळविली. ही शिष्यवृत्ति प्रथम महिना २ रुपये होती. ती ते जसे उत्तरोत्तर वरच्या वर्गांत गेले तसतशी वाढत गेली. महिना रु. ७, १२, १८, ३० व ४० अशा प्रमाणांत ती वाढत गेल्यामुळें त्यांचें कॉलेजचें शिक्षण स्वावलंबनानें साध्य झालें. आपल्या मुलाला किमान इंग्रजी व संस्कृत शिक्षण मिळालें म्हणजे सार्थक झालें, असें बाळकृष्णशास्त्र्यांना वाटत होतें; पण त्यांचा मुलगा हुशार निघून, शिष्यवृत्त्या मिळवून स्वावलंबनानें पदवीधर झाला.

बी. ए. झाल्यावर वयाच्या २२ व्या वर्षीं काशीनाथ बाळकृष्णांना १२॥ रुपयांची दक्षिणा फेलोशिप मिळाली व लागलींच मध्यप्रांतांत नागपूर येथें सरकारी ग्रंथालयांत क्यूरेटर म्हणून त्यांची नेमणूक झाली. कांहीं काळानंतर ते वऱ्हाडांतल्या एका हायस्कुलांत फर्स्ट असिस्टंट म्हणून शिक्षकाचें

काम करूं लागले. पुढें मुंबई येथें कायद्याचा अभ्यास करून ते एल्‌एल्. बी. झाले व सब्‌जज्ज म्हणून सरकारी नोकरींत शिरले. आणि अखेर फर्स्ट ग्रेड फर्स्ट क्लास सब्‌जज्ज म्हणून १९०१ सालीं सुरत येथें सेवानिवृत्त झाले. त्यांचे वडील बाळकृष्णशास्त्री त्यांच्या वयाच्या ३५ व्या वर्षीं व स्वतःच्या ७० व्या वर्षीं १८७९ सालीं निधन पावले.

सेवानिवृत्त झाल्यावर डेक्कन कॉलेजांत संस्कृतचे ऑनररी प्रोफेसर म्हणून त्यांनीं सहा वर्षे अध्यापनाचें कार्य केलें. एम्. ए. च्या विद्यार्थ्यांना त्यांनीं वेदान्त व धर्म हे विषय शिकविले. ते भगवानदास पुरुषोत्तमदास संस्कृत स्कॉलर होते. त्यांनीं उपनिषद् भाषांतरमाला सुरू केली होती; व या मालेंतून बृहदारण्यकोपनिषदाचें मराठी भाषांतर केलें. या भाषांतराचा प्रथम खंड १९०७ सालीं त्यांचे वकील चिरंजीव विष्णु काशीनाथ यांनीं प्रसिद्ध केला. या खंडाच्या प्रस्तावनेंत प्रकाशकांनीं काढलेले पुढील उद्‌गार वाचकांना मननीय वाटतील : "अत्यंत शुद्ध, सरळ, सुबोध व खुलाशाच्या टीपांसहित विद्यापरायण ती. का. बा. मराठे, संस्कृत स्कॉलर यांनीं केलेलें भाषांतर विद्वज्जनांस अर्पण करीत आहोंत. तें छापून सर्व लोकांस उपयोगी होण्याकरितां विद्याभिवृद्धि करूं इच्छिणारे उदार आश्रयदाते व बुभुत्सु लोक आश्रय देतील अशी आशा बाळगतों. तातपादांनीं अत्यंत परिश्रमानें हें भाषांतर केलें असून अद्वैत ज्ञानाचा प्रसार होऊन देशबांधवांनीं परमार्थाचा विचार करावा म्हणून ह्या अध्यायाची किंमत अगदीं अल्प ठेवली आहे."

सरकारी नोकरींत असतांना का. बा. मराठे यांनीं शास्त्रीय विषयांचीं शालेय पुस्तकें इंग्रजींतून मराठींत आणलीं. मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखात्यातर्फे त्यांनीं बालशिक्षा ग्रंथमालेसाठीं पुढीलप्रमाणें शास्त्रीय पुस्तकें भाषांतरित केलीं: रसायनशास्त्र (१८७९), जीवनेंद्रियशास्त्र (१८७९), भूवर्णन (१८८०), ज्योतिःशास्त्र (१८८०), भूशास्त्र (१८८६), वनस्पतिशास्त्र (१८८७), न्यायशास्त्र (१८८२). त्यांच्या 'रसायनशास्त्र' या पुस्तकाची १९१४ सालीं तिसरी आवृत्ति निघाली. या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत त्यांनीं आपल्या शास्त्रीय पुस्तकांची भूमिका पुढीलप्रमाणें निवेदन केली आहे : "विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, पाश्चात्य देशांतील लोकांची सर्व तऱ्हेनें प्रगति होत आहे. ते लोक एकंदर सृष्टींतील पदार्थांचें स्वरूप, पदार्थांच्या

शक्ति व त्या पदार्थांचे परस्परांशीं संबंध या गोष्टींची ओळख करून घेण्याविषयीं उत्तरोत्तर वाढते यत्न करीत आहेत. त्या यत्नांवर त्यांची प्रगति अवलंबून आहे. हिंदुस्थानांतील लोकांची यत्नपराङ्मुखता प्राचीन काळीं पुष्कळ अभिवृद्ध झाली होती; व अद्यापि त्याची गर्द छाया या देशावर पडली असल्याकारणानें सृष्ट पदार्थांच्या ज्ञानाची प्राप्ति करून घेण्याच्या कामीं अवश्य ते यत्न अगदीं शिथिल झाले होते व आहेत. याकरितां इंग्लंडांतील प्रोफेसर रास्को वगैरे विद्वानांनीं सृष्ट पदार्थांविषयीं जीं पहिलीं पुस्तकें लिहिलीं त्यांचीं भाषांतरें करून आम्हीं देशबांधवापुढें सुमारें ३५ वर्षांपूर्वीं मांडलीं. त्यापैकीं रसायनशास्त्राच्या पहिल्या पुस्तकाची पहिली व दुसरी आवृत्ति खपून गेली व ही तिसरी आवृत्ति काढली आहे. या पुस्तकाचा जितका प्रसार होईल तितकें देशांतील अज्ञान व उद्योगधंद्याविषयींच्या प्रवृत्तीचें शैथिल्य दूर होणार आहे." (ता. ३-१-१९१४).

कै. का. बा. मराठे यांचें पहिलें पुस्तक 'वेदांविषयीं निबंध' हें १८६९ सालीं प्रसिद्ध झालें. हें पुस्तक म्हणजे नागपूर येथें दिलेलें व्याख्यान होय. त्यानंतरचें त्यांचें महत्त्वाचें व विशेष गाजलेलें पुस्तक म्हणजे 'नावल व नाटक ह्यांविषयीं निबंध' (१८७२) हें होय. कै. मराठे यांनीं बृहदारण्यकोपनिषदाचे अध्याय ३ व ४ यांचें भाषांतर १९०७ सालच्या पूर्वीं केलें. त्यांनीं वाडसंकलित सवाई माधवरावांची रोजनिशी (भाग १-२-३) संपादित केली. आणि त्यांचें सर्वांत मोठें व संस्मरणीय वाङ्मयकार्य म्हटलें म्हणजे त्यांनीं तुकारामाच्या अभंगांचें इंग्रजींत भाषांतर केलें. हें गद्य भाषांतर 'Poems of Tukaram' या नांवानें प्रसिद्ध झालें असून जे. नेल्सन फ्रेजर यांच्या सहकार्यानें तें करण्यांत आलें आहे. हें भाषांतर मद्रासच्या खिश्चन लिटरेचर सोसायटी ऑफ् इंडिया या संस्थेनें १९१३ सालीं तीन खंडांत छापून प्रसिद्ध केलें.

कै. मराठे पुण्यास असतांना त्यांचा अनेक सार्वजनिक व शैक्षणिक संस्थांशीं निकट संबंध होता. ते प्रार्थनासमाजिस्ट होते. वयाच्या ७५ व्या वर्षी ता. १३-११-१९१८ रोजीं पुणें येथें ते निधन पावले.

आमचीं वाङ्मयीन प्रकाशनें

मराठी भाषा : उद्गम आणि विकास
(प्रा. कृ. पां. कुलकर्णी) तिसरी आवृत्ति रु. १०=००

अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका
(प्रा. गं. बा. सरदार) दुसरी आवृत्ति ६=००

विचारविलास
(प्रा. वा. म. जोशी) तिसरी आवृत्ति ३=००

संस्कृत वाङ्मयाचा सोपपत्तिक इतिहास
(डॉ. वि. बा. करंबेळकर) ५=००

केशवसुतांची कविता
(डॉ. दु. का. संत—प्रा. स. रा. गाडगीळ) १=२५

मराठीचें स्वरूपदर्शन
(प्रा. श्री. र. भिडे—प्रा. गो. म कुलकर्णी) ३=५०

प्रश्नोत्तररूपी मराठी वाङ्मयाचा इतिहास—भाग १
(प्रा. द. ल. मांजरेकर) २=२५

प्रश्नोत्तररूपी मराठी वाङ्मयाचा इतिहास—भाग २
(प्रा. गं. भा. निरंतर) ३=००

ज्ञान हें विष कीं अमृत?
(प्रा. वा. म. जोशी) तिसरी आवृत्ति १=२५

गद्यगुच्छ
(न. चिं. केळकर) सहावी आवृत्ति ३=००

स्वभावलेखन
(डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे) ४=००

मॉडर्न बुकडेपो, बाजीराव रस्ता, पुणें २.

नावल म्हणजे काय ?

नावल म्हणजे चमत्कारीक गोष्ट, ज्यांत आश्चर्य कारक गोष्टी फार, व जो वाचला असतां अवलपासून आखेरपर्यंत वाचणारांस जागोजाग नवल वाटावें, अश्या प्रकारचा जो ग्रंथ, त्यास इंग्रजींत 'नावल' अशी संज्ञा आहे. नावल म्हणजे नवलसमूह अश्या अर्थसाम्यावरून मराठींत ही सदर्हू ग्रंथांचें तेंच नांव राखलें असतां चिंता नाहीं. संस्कृतामध्यें अश्या प्रकारचे ग्रंथ विरळा. सुबंधु नामक कवीची वासवदत्ता, दंडीचें दशकुमार चरित्र, बाण कवीची कादंबरी अशीं कांहीं नावलें संस्कृत भाषेमध्यें आहेत. परंतु नावलें गद्यात्मक असावीं, असा नियम केला नाहीं तर, संस्कृतांत अनेक नावलें सांपडतील; किंबहुना शास्त्रविषयक ग्रंथ वगळले तर सर्वच संस्कृत ग्रंथांस नावल म्हणण्यास काय चिंता आहे ? चार वेद, अष्टादश पुराणें, व एकंदर काव्यें हीं काय नावलें नव्हेत ? नाटक, हें एक नावलाचेंच अन्य स्वरूप आहे. त्याचा विचार निबंधाच्या दुसऱ्या प्रकरणांत करूं.

आदि काव्य जें वाल्मिकि-रामायण त्यास आपण काय नांव द्यावें ! तें नावल नव्हे काय ! रामचंद्रासारिख्या शूर पुरुषांचें चरित्र एकवट करून वाल्मिकीनें किती सुरस आख्यायिका रचली आहे ! एकदा रसिक पुराणिक रामायण-कथा सांगत असला म्हणजे कशी हजारों मंडळी झुलत राहते ! हें काय त्या कथेचें माहात्म्य, कीं कवीची शक्ति ! विद्वज्जन हो, असें म्हणण्यास कांहीं एक हरकत नाहीं कीं रामकथेंतील माधुर्य वाल्मीकीच्या मुखांतलें. तसेंच महाभारत तें काय सामान्य नावल आहे ! नवलांचा केवळ समुद्र ! तशींच अठरापुराणें व श्रीमद्भागवत हीं एका पेक्षां एक सुरस व मनोरंजक नावलें आहेत.

महाभारत, भागवत, रामायण, व इतर पुराणें ह्यांमध्यें मनोरंजकपणाचें बीज एवढेंच आहे कीं त्यामध्यें अद्‌भुतांचा भरणा फार. प्राचीन काळीं थोर

पुरुषांची चरित्रें लोक एकमेकाला गाऊन दाखवीत असत. जसें हल्लीं गोंधळी पवाडे म्हणून मन रिझवतात, तसें पूर्वीं भाट, बंदी, बारोठ, गांवोगांवीं वीरांचीं चरित्रें गात फिरत, व त्याजवर चरितार्थ चालवीत. अद्यापि गुजरार्थेत बारोठ आहेत त्यापाशीं अनेक मोठमोठ्या लोकांच्या वंशांची माहिती मिळते. ह्या वंशचरित्रांवर आपला निर्वाह, तेव्हां त्यांच्या योगानें लोकांचें मन रिझेल असें त्यांस स्वरूप देणें भाग पडे. अर्थात् अलौकिक गोष्टींचा व अद्‌भुतांचा थोडाथोडा प्रवेश झाला असेल. अशीं अद्‌भुतांनीं मिश्रित झालेलीं चरित्रें व्यासासारिख्या महाकवींच्या हातीं लागल्यावर अतिशयोक्ति आदिकरून तिखट मीठ लागून हल्लीं पुराणांत वर्णिलीं आहेत त्या स्वरूपाला आलीं, ह्यांत आश्चर्य कोणचें ! रामायण देखील वाल्मीकीनें रचिलें, त्यावेळीं शंभर कोटी बत्तीस अक्षरी श्लोक होतील इतका ग्रंथ होता. तो त्यानें रामाचे मुलगे कुश लव ह्यांकडून गावविला. ह्या गोष्टीमध्यें काळाची वा सत्याची किती गडबड असेल ती असो. परंतु इतकें खरें असण्याचा संभव आहे कीं रामाविषयीं असंख्य गोष्टी प्रसिद्ध होत्या, त्या वाल्मीकि ऋषीनें एकत्र करून त्यांस सर्व अलंकारांनीं युक्त असें कवितारूप दिलें; व त्यापुढें पुष्कळ लोक गाऊन दाखविण्याकरितां पाठ करीत असत. अश्या प्रकारें अनेक कथा आरंभीं सामान्य असतां कांहींच्या बाहींच झाल्या आहेत. एक लहानश्या पराचा कावळा किंबहुना कावळे होतात ही जगप्रसिद्ध म्हण आहे.

परंतु असें रूपांतर झाल्याकारणानेंच त्या ग्रंथांस थोरवी आहे. वर सांगितल्याप्रमाणें त्यांत अद्‌भुतांचें मिश्रण नसतें, तर तीं इतकीं लोकप्रिय झालीं असतीं काय ! आज सहस्रावधि वर्षें लाखो बायका, मुलें, व वृद्ध मनुष्यें ह्यांचें मनोरंजन झालें, व आनंदानें कालक्रमणा झाली असें काम सामान्य चरित्रांपासून झालें असतें काय ! वानराचें शेपूट व चापल्य, आणि मनुष्यांची अक्कल, व स्वामिभक्ति, व एक सहस्र हत्तींचें बळ हीं एकत्र करून मारुती उभा केला. त्यामुळें अनेक अद्‌भुत संकटें उपस्थित करून दूर करितां आलीं. एका अस्त्राचे अंगीं हजार माणसें मारण्याची शक्ति कल्पून एका शिपायाबद्दल १००० मनुष्यांचा मोबदला केला असतां काय चिंता आहे ! वर्षाऋतूचे आरंभीं आकाशाकडे पहात बसलें असतां काय थोडीं गंधर्वनगरें

दृष्टीस पडतात ! मनुष्यमात्रास कल्पनाशक्ति दिली आहे, तिला रिझवणें असल्यास लोकोत्तर कल्पनाच केल्या पाहिजेत.

तथापि तत्वद्रष्टे आहेत ते असल्या कल्पनांना भुलत नाहींत. ते असल्या सालंकार वर्णनांतून सार घेऊन बाकीच्या कविकल्पोत्पन्न भागावर विश्वास ठेवीत नाहींत. पण त्या काल्पनिक भागाचा उपयोग विलक्षण आहे. मोठमोठे सूर्यवंश व चंद्रवंश ह्यांतील राजांच्या कथा आजपावेतों आबालवृद्धांच्या मनामध्यें जागृत आहेत. कर्णाच्या दातृत्वाच्या गोष्टी ऐकून अनेक पुरुषांच्या अंतःकरणांत औदार्य उत्पन्न होतें; तसेंच शिबि राजाचें चरित्र ऐकून कित्येकांच्या मनांत सहिष्णुता प्राप्त झाली असेल; युधिष्ठिर अथवा धर्मराजाच्या किंवा नळराजाच्या सत्यपणामुळें व सहनशीळपणानें असंख्य लोकांस संकटसमयीं धैर्य येतें. तसेंच ह्या नवलमिश्रित वर्णनांनीं आज पावेतों,

मान्धाताच भगीरथश्च सगरो मान्यःककुस्थो रघुः
पूरूःसोपि पुरूरवाःसचशिबिःपुण्यश्चरुक्मांगदः
वैदेहो नहुषश्च हैहयपतिर्वीरो ययातिर्नलः
पार्थश्चेतिनृपाःप्रशस्तयशसःप्रादुर्बभूवर्नकिम् ॥

मान्धाताप्रभृति मोठे पराक्रमी राजे प्रसिद्ध झाले नाहींत काय ? ह्या राजांची चरित्रें इतकीं मनोवेधक झालीं आहेत हा कवींचा उपकार नव्हे काय ?

कालीदास, माघ, भारवि, श्रीहर्ष आदीकरून कवींच्या काव्यामध्यें ही नवल-समूह फार, व कल्पना गौरव फार, म्हणूनच तीं काव्यें वाचण्या विषयीं आपण इतकें झटतों. इतिहासरूपानें रघुवंशांतील राजांची एक नुसती याद, व प्रत्येकानें काय काय केलें ह्याचें एक टाचण कालिदासादि कवी शिवाय दुसऱ्या मनुष्यानें एकाद्या चोपडींत लिहून ठेविलें असतें तर रघुवंशांतले राजे इतके उदयास येते काय ? दिलीपराजा, रघुराजा, अजराजा ह्यांचीं नांवें तरी आपल्यास ठाऊक असतीं काय ? असो, महावीरांची व सत्पुरुषांची आठवण राहण्यास असलीं अद्‌भुत मिश्रित चरित्रें फार चांगलीं साधनें आहेत. ज्या देशांत असले इतिहास व असलीं चरित्रें नाहींत, तो देश एक प्रकारच्या सुखास आंचवला असें म्हणण्यास चिंता नाहीं.

कोरडी नीति शिकवली असतां कोणाच्या मनांत ठसत नाहीं. इतिहासांतलीं उदाहरणें सांगितलीं म्हणजे पक्की ठसते. म्हणून इतिहास हा

उदाहरणासहित नीतिग्रंथच आहे. परंतु पुण्यश्लोकांची जशी याद आहे—

पुण्यश्लोको नलोराजा, पुण्यश्लोको युधिष्ठिरः
पुण्यश्लोकाच्चवैदेही, पुण्यश्लोकोजनार्दनः ॥

अशी जो जो सद्गुण ज्या ज्या पुरुषामध्यें फार त्यांची त्यांची त्या गुणाच्या संबंधानें एक एक माळिका करून ठेविल्यापासून सामान्य जनांना काय फायदा आहे ? उदाहरणार्थ दानशूरत्वाविषयीं हरिश्चंद्रराजा व श्रियाळराजा ह्यांची मोठी ख्याति होती; परंतु ज्या रीतीनें त्यांचीं चरित्रें सांगतात, तशीं कवीनीं बनवून ठेविलीं नसतीं, तर त्यांच्या धैर्याचा व औदार्याचा बळकट ठसा आपल्या अंतःकरणावर कसा उठला असता ? त्या कथा वाचिल्या, ऐकिल्या अथवा नाटक रूपानें रंग—भूमीवर पाहिल्या म्हणजे सहृदयानें अंतःकरण आर्द्र होतेंच. एवढेंच नाहीं, कधीं कधीं नेत्रांतून अश्रुधारा चालतात. असो. असें अनेक प्रकारें ऐतिहासिक पुरुषांच्या चरितांच्या उदाहरणांनीं आपले मनोभाव पालटतात. ऐतिहासिक पुरुषांचा ' इति-ह आस ' (असा, असाच झाला) अश्या सत्य रूपानें वृत्तांत लिहिला तर उदाहरणोपयोगी होईल खरा, परंतु असा इतिहास वाचण्यास फार थोडे लोक प्रवृत्त होतील. इतिहासाचें वाचन म्हटलें म्हणजे मरुप्रदेशांतील प्रवासासारिखें आहे. अमुक पुरुष अमुक ठिकाणीं अमुक वेळेस जन्मला; तो आपल्या आई बापाचा फार लाडका असे; तो लहानपणीं फार खोडकर असे; अंमळ मोठा झाल्यावर आपल्या गांवच्या जातभाईनां घेऊन त्या देशच्या राजाला त्यानें मारलें, व त्याच्या राज्यावर बसला; त्याला पुष्कळ बायका होत्या; पुष्कळ मुलें झालीं; अमुक देशचे राजे त्याचे मित्र होते; त्यांस त्यानें मदत करून त्या करवीं त्यांचे शत्रु जिंकविले; दोन लढाया जिंकल्या, तीन लढाया हरला, व अमुक स्थळीं अमुक कारणानें अमुक वर्षीं मेला. अशीं इतिहास रूपानें चरित्रें लिहिली असतां तत्त्वबुभुत्सू वाचणारे फार थोडे निघतील. हल्लींच्या काळीं सुधारलेल्या देशांत सत्यशोधक विशेष झाले आहेत; म्हणून सत्य इतिहासाची अभिरुचि पुष्कळ लोकांस उत्पन्न झाली आहे. परंतु असत्य अगदीं अप्रिय, असेंही अद्याप झालें नाहीं. आणि अज्ञान लोकांना तें कधींही अप्रिय होणार नाहीं. खऱ्या गोष्टी एकीकडे ठेवून, ज्यापासून मनो-रंजन होतें त्या गोष्टी खोट्या, कल्पित, असें जरी पहिल्या पानावर सांगितलें

असलें तरी, त्या पसंद पडतात, व लोकप्रिय होतात. मराठ्यांच्या बखरीला गिऱ्हाईक मिळत नाहीं, पण मुक्तमाला, मंजुघोषा, ह्यांच्या निघाल्या दिवसापासून दोन दोन आवृत्ती झाल्या. इतिहासांत वर्णिलेल्या पुरुषांचें वृत्त लिहिणें झाल्यास त्यांत देखील कांहीं कल्पित चमत्कार मिश्र केले असतां तें वृत्त पुष्कळ लोकांस मनोरंजक होतें. पक्की खात्री आहे कीं शिवाजीसारिख्या पुरुषाचें चरित्र, त्यांत कांहीं अलौकिक गोष्टी मिसळल्या असतां, फार लोकप्रिय होईल. शिवाजीची सात वेळ भवानीची गाठ पडली; तिनें त्याला एक दिव्य खड्ग दिलें; व अनेक प्रसंगीं त्यास देवीनें महासंकटांतून मुक्त केलें, अशा प्रकारच्या अनेक अद्‌भुत गोष्टी लोकांनीं शिवाजीच्या चरितांत अगोदरच मिश्र केल्या आहेत. त्यांवर एखाद्या कवीची बनावणी झाली म्हणजे आमच्या शिवाजी राजांना महाभारतासारख्या ग्रंथांत जागा मिळण्यास काय हरकत आहे ?

हरकत नसावीच असें आम्ही म्हणतों. वर सांगितल्याप्रमाणें वीर व थोर पुरुषांच्या चरित्रांपासून वाचणारांस व ऐकणारांस मोठा फायदा होत आहे, तर तीं लोक प्रीतीनें वाचतील असें त्यांस स्वरूप देण्यास काय चिंता आहे ? परंतु सत्याच्या बळकट पायावर इमारत रचली तर ती कांहीं दिवस टिकेल, व विद्वानांच्या व अविद्वानांच्या मनाला क्षणभर विश्रांति व आनंद ह्यांचे ठिकाण होईल. जींत सत्याचा लेश देखील नाहीं ती गोष्ट केवळ अविद्वानांचें मन कांहीं दिवस रंजवील; परंतु तीपासून दुसरा उपयोग होणार नाहीं. भारत रामायण ग्रंथ आज पावेतो मान्य झाले व चिरकाळ मान्य राहतील. ह्याचें कारण त्यांत मनोरंजक गोष्टी आहेत एवढेंच नाहीं, त्यांत श्रद्धा, भक्ति व विश्वास बसण्यासारिख्या कांहीं गोष्टी आहेत. भावाबंधाचें वैर, सत्यानें वागण्याचे चांगले परिणाम, परमेश्वर भक्तीचीं फळें, पितापुत्रस्नेह, बंधुप्रीति, बायकोची प्रीति, बायकोचा विरह, व उपकार केला असतां स्नेह व सख्य उत्पन्न होतें ह्याचे प्रत्यक्ष दाखले आहेत; म्हणून ते ग्रंथ सर्वांना आवडतात.

सत्याच्या आश्रयानें जसें असत्य शोभतें, व उपयुक्त होतें, तसें असत्य स्वतंत्रपणें उपयोगी होत नाहीं. कोणी म्हणतील शुद्ध सत्य निराळें ठेवावें, व असत्य निराळें ठेवावें. नावल लिहिण्याच्या कामांत असा निग्रह

उपयोगाचा नाहीं. विषयगत व्यक्ति सत्य असून त्यांचें वर्णन अंशतः अद्भुत-मिश्रित पाहिजे ह्यास, इंग्रजींत रोमान्स (romance) म्हणतात. हा प्रकार फारच उत्तम. कारण अशा प्रकारच्या नावलांपासून मोठा उपयोग होतो. अथवा वर्णन समग्र सत्य असून व्यक्ति कल्पित असल्या पाहिजेत. हा दुसरा प्रकार. ह्यास इंग्रजीत नाव्हल (novel) असें म्हणतात. वर्णन सत्य असावें ह्याचा अर्थ इतकाच कीं प्रत्येक व्यक्तीच्या संबधानें प्रत्येक गोष्ट कल्पित अथवा खरी, संभवण्या सारिखी असली पाहिजे. मंजुघोषा नावलांतील वसंतमाधवाचें विमान, मंजुघोषेची अप्रतिम पंडितासारिखी पत्र लिहिण्याची शैली, विचित्र पुरींतील कदंबा देवीचा प्रत्यक्ष अवतार, म्हणजे एका मानवी प्राण्यानें भिंत फोडून पुढें येणें, पद्मनयना राजमहालांत असतां एका गैरमाहित म्हाताऱ्या बाईच्या पाठीमागून मुकाट्यानें चालती झाली, ह्या गोष्टी अम्मळ असंभवाच्या आहेत. तसेंच रत्नप्रभेमध्यें मदनविलासानें रत्नप्रभेच्या दाराशीं गाडी आणली असतां त्यांत तिची वयस्क मावशी येऊन बसली, व तिलाच रत्नप्रभा म्हणून मदनविलास घेऊन गेला; तशीच कव्यादेची दासी तिचें तोंड बांधून एका गड्यानें डोकीवर तीन कोस नेली, व त्याविषयीं कांहीं एक गडबड झाली नाहीं; पुढें पावसाच्या झपाट्यांत मदन-विलासाची गाडी तीस कोस गेली; ह्या गोष्टी अंमळ चांगल्याशा मनांत भरत नाहींत. मुक्तमालेला भुईमध्यें पुरली असतांही तिचें जीवंत राहणें, चार चार दिवस व कधीं कधीं आठवडेच्या आठवडे अन्न-पाण्याविना वांचणें ह्या ही गोष्टी असंभाव्य आहेत. कोणी एका गैर माहितीच्या गोसाव्याबरोबर निबिड अरण्यांत डोंगरावर एका गुहेंत जाणें हेंही श्रीमंतांच्या स्त्रियांस अशक्य आहे. अशा अनेक गोष्टी प्रस्तुतच्या नावलांतून आहेत, त्यांत स्वाभाविकपणा नाहीं. प्रत्येक नावलामध्यें वर सांगितलेल्या प्रकारच्या गोष्टीशिवाय स्त्रियांच्या पातिव्रत्यावर फार हल्ला केला आहे. जागोजाग अशीं संकटें आणलीं आहेत कीं पातिव्रत्यभंग झालाच पाहिजे. त्या संकटांतून त्या स्त्रियांचें पातिव्रत्य निर्दोष राहिलें, ही संभवा पलीकडची गोष्ट आहे. अशी पातिव्रत्याची परीक्षा देऊन ज्या स्त्रिया शुद्ध राहिल्या त्या इहलोकच्या नव्हेत. सांप्रतच्या स्त्रिया त्यांच्या तुकीस उतरणार नाहींत; व तसें पातिव्रत्य त्यांच्या आटोक्यांतही नाहीं. आणखी प्रत्येक नावलामध्यें मुख्य स्त्रीवर (नायिकेवर) व मुख्य

पुरुषावर (नायकावर) जीं संकटें आणलीं आहेत, त्यांतून ते वांचले तरी कसे ? अशी शंका सर्वांनां येते. तेव्हां वर सांगितल्याप्रमाणें नावलाचे दोन प्रकार. एक पुरुष सत्य, पण त्यांच्या हकीकतींत पुष्कळ असंभाव्य, मिथ्या, व अद्‌भुत अशा गोष्टी घालून त्यांचें चरित्र मनोरंजक करावयाचें. दुसरा प्रकार असा कीं पुरुष मिथ्या, पण त्यांच्या संबंधानें ज्या गोष्टी सांगावयाच्या, त्या अगदीं संभाव्य, शक्य, स्वाभाविक असल्या पाहिजेत. दोन्ही मिथ्या असतील तर त्यांपासून सज्ञानास तर काय पण अज्ञानास देखील कांहीं एक उपयोग व्हावयाचा नाहीं. सांप्रत जीं नावलें पिकत आहेत तीं दुसऱ्या प्रकारचीं आहेत; पण वर्णनामध्यें जागोजाग दोष आहेत. जेवढे पुरुष तेवढे मदनाचे पुतळे, जेवढ्या स्त्रिया तेवढ्या तिलोत्तमा; प्रत्येक शोकस्थलीं मरणासारिखा शोक, व आनंदस्थळीं स्वर्गासारिखा आनंद, दुसरी उपमाच नाहीं. नवरा बायकोचें भाषण म्हणजे प्रेमाचा लोट ! त्यांत अभिप्राय गूढ राखणें, किंवा गांभीर्यहीं बिलकुल नाहींत. सुलोचना नावलांत राजा म्हणतो – तारामती, हें साखरलिंबू पाहिलें, हें कश्यासारिखें दिसतें ? सांग बरें.

तारा – आम्हांस असलें कांहीं समजत नाहीं.

राजा – बरें मीतरी सांगू ? हे तुझ्या – म्हणून पुढे बोलतो.

तारा – पुरें तें, कांहीं तरीच कल्पना पण, दुसरें कांहीं बोलणेंच नाहीं. कांहीं तरी म्हणून, कोणीकडून तरी, दुसऱ्याची थट्टा करावयाची हें मला ठाऊक आहे.

प्रथमतः राजाच्या भाषणांत ‘ तुझ्यापुढें ’ – म्हणून ‘ पुढें बोलतो, ’ असें लिहिलें आहे तें बरोबर नाहीं. तुझ्या – ‘ म्हणून उगीच राहतो, ’ असें असावें. परंतु अशीं भाषणें स्त्री पुरुषांच्या मुखांत घातलीं तर अर्थ गांभीर्य रहात नाहीं स्त्रीचा विरह झाला असतां आम्रफळ, नारिंग, साखरलिंबू ह्यांच्यांशीं स्त्रीचे स्तन तुळिले तर पोटांतून उकळी येईल; परंतु स्त्री जवळ असतांही प्रतिफळदर्शनीं तिचा विनोद करणें ह्या गोष्टीला तारामतीनें दिलेला चाबूकच योग्य आहे. रति समय वर्णन करित असतां किंवा स्त्री पुरुषांची शृंगारिक भेट वर्णित असतां तीं प्रेमानें एकत्र बसलीं, परस्परांच्या मुखाकडे पाहून परस्परांच्या अंतःकरणांत आनंदाच्या उकळ्या फुटल्या, व एकमेकांशीं विनोदाच्या गोष्टी बोलूं लागलीं इतक्या अभिप्रायाचे शब्द बस

आहेत. ह्यावरून अभिप्राय गूढ राखणें हा नावलांचा मोठाच धर्म आहे. ह्याशिवाय नावलामध्यें एणेंप्रमाणें धर्म असले पाहिजेत.

१ (अ) जसें नाटकांत तसेंच नावलांत काळ, वेळ, पुरुषस्वभाव, व स्थळ हीं एक असलीं पाहिजेत. विचित्रपुरीमध्यें चार पुरुषांचें चरित्र लिहिलें आहे. व ते चौथे कलकत्ता युनिवर्सिटींतले मोठे विद्वान होते अशी कल्पना केली आहे. त्या पैकीं एक राजपुत्र होता, व दुसरा प्रधान पुत्र होता. आपल्या देशांत 'एम्. ए.' ची परीक्षा उतरण्या सारिखे राजपुत्र व प्रधानपुत्र कोठें असतील ते असोत. त्यांचीं नांवें युनिवर्सिटी—क्यालेंदरांतून नाहींत हें खचित. 'एम्. ए' ची परीक्षा देण्यासारिखे राजपुत्र व प्रधानपुत्र विसाव्या शतकांत कदाचित् होतील, परंतु त्यावेळचीं माणसें आणि पंधराव्या शतकांतली मोगलाईतील विचित्रपुरी ह्यांचा मेळ कसा पडेल तो पडो. अश्या वर्णनां-पासून गोष्टी स्वभावसिद्ध वाटून त्या वाचणाराच्या हृदयास भिनाव्या तश्या भिनत नाहींत. तसें बहुतेक नावलांत हल्लींच्या कालीं ज्या गोष्टींचा विशेष संभव आहे त्या गोष्टी हिंदू राजे कल्पून त्यांच्या काळांत झाल्या असें वर्णिलें आहे, त्यामुळें काळभेद होतो, व त्यामुळें असत्यबुद्धि उत्पन्न होते. मंजु-घोषेंत जागोजाग विमानाची योजना केल्यामुळें त्या नावलाचा स्वभाव-सिद्धपणा अगदीं गेला.

(ब) जे पुरुष नावलांत वर्णिले असतील त्यांचा स्वभावही एकसारखा पाहिजे. रत्नप्रभेची मावशी वर सांगितली, तिला मदनविलासानें झिटका-रिलें, त्यानंतर ती त्याशीं विरोधभावानें वागूं लागली, व तिनें त्यास घरां-तूनही काढून दिलें. तिचें घरांमध्यें वर्चस्व होतें, व नवऱ्याचीही अनुमति होती, म्हणून मदनविलासाविषयीं यत्किंचितही तिची इच्छा असती, तर ती त्यास काढून देतीना. व मदनविलास आपल्यास तुच्छ मानतो असें ठाऊक असतां मध्यान्ह रात्रीं त्याच्या हस्तगत झाली, ह्यांतही कांहीं आशय दिसत नाहीं. तेव्हां तिच्या वर्तणुकींत ह्या स्थळीं अंमळ भिन्नपणा दिसून येतो. तसेंच मदनविलासाची लग्नाची बायको चंपकवल्लरी सुंदर असतां, व तिचें ह्याचें हृदय खवळून देण्यासारिखें प्रेम असतां, तो फक्त देश पाहण्याच्या इच्छेनें एकदम घरांतून निघून जातो; व रत्नप्रभेला पाहिल्याबरोबर तिला बायको करावें म्हणून मनांत आणतो; तिला घरांतून पळवून नेतो; ह्या गोष्टी

अम्मळ विलग दिसतात. कारण पुनर्विवाह करण्याची चाल होती असें जर शेवटीं मानलें आहे, तर त्याच काळीं दोन बायकांना एकदम नाडणें हें त्यालोकांस आवडत नव्हतें, अशी कल्पना केली असतां अम्मळ बरी दिसेल. मंजुघोषेंत राणीनें वसंतीस पुष्कळ मार दिला असतांही मंजुघोषेनें दिलेल्या लखोट्याची आठवण झाली नाहीं, व झाड्यांतही तो सांपडला नाहीं. तो एक क्षणानें राजासमोर गेल्याबरोबर सांपडला, व तिनें पोटकळीचा काढून दिला. असे संविधानकाचे दोष मंजुघोषेंत जागोजाग आहेत.

प्रसंग पाहून लांब अथवा आखूड, कठोर, अथवा मृदु, पांडित्ययुक्त किंवा साधारण भाषण पात्रांच्या तोंडीं घातलें पाहिजे. मंजुघोषेचा बाप आपल्या बायकोवर कधीं रागावयचा नाहीं, तो रागावला व म्हणतो " माझ्या इष्ट कन्येनें नृपश्रेष्ट कुमारास शिष्टजनही संतुष्ट होऊन ज्यास मान तुकवतील अशा अष्टविवाहांतील वरिष्ट गांधर्व विवाहें करून वरून यथेष्ट सुखोपभोगानुभव घेणार, तों या दुष्टमति भ्रष्ट स्त्रीनें केवळ एकनिष्ट सापत्न व मत्सर भावानें तिजवर महारिष्ट आणावें असा हेतु धारण करूनच माझे मनांत तिजविषयीं क्लिष्ट कल्पना भरवून रुष्ट अंतःकरणानें तिजला नाना कष्ट भोगावयास लावून नष्ट दशेस लाविलें हें स्पष्ट आहे. "

काय ष्ट कारांची गर्दी ! ! हें खष्ट वाक्य ऐकिल्यावर ज्यास वाद इष्ट आहे तो असें म्हणेल कीं असल्या रागाच्या अश्लिष्ट प्रसंगीं महिष्ट व गरिष्ट शब्दांचें साधिष्ट काम नाहीं. त्या संतापलेल्या म्हाताऱ्याला इतके ष्टकारयुक्त शब्द कसे आठवले कोण जाणें. (क) नावलामध्यें स्थलैक्य पाहिजे परंतु सर्व हिंदुस्थान देश एकच आहे असें घेतलें तर प्रस्तुतच्या नावलकारांच्या लिहिण्यास फारसा दोष येत नाहीं.

२ नावलांमध्यें अशा गोष्टी असाव्या कीं त्या वाचल्या असतां वाचणारांमध्यें विशेष दया, माया, स्नेह, प्रीति, शौर्य, धैर्य, औदार्य वगैरे गुण उत्पन्न होतील. पुराणादिकांच्या श्रवणापासून अंशतः हे गुण वृद्धिंगत होतात ह्यांत संशय नाहीं. परंतु अर्वाचीन नावलांमध्यें जागोजाग श्रृंगार फार, व शोक फार. शृंगाररसाच्या योगानें कांहीं प्रीतीचें बीज पेरलें जात असेल खरें, परंतु शोक अतिशय, त्यामुळें जगताविषयीं औदासिन्य फार उत्पन्न होतें. प्रत्येक प्रस्तुतचें नावल संकटांचा सागर आहे. एकावर एक संकटें येतात व

वाचणाराचें अंतःकरण खिन्न होते. जागोजाग संकटांचें वर्णन तर असें हृदयवेधक केलें आहे कीं वाचणाराचें हृदय फुटून त्यांतील द्रवाच्या डोळयांवाटे धारा चालतात. मुक्तमालेच्या असंख्य संकटांनीं किती स्त्रियांच्या व तरुणांच्या सुकुमार हृदयांस घरें पडलीं असतील ! मंजुघोषेला किती असह्य दुःखांत घातलें आहे ! रत्नप्रभेला दुःखांत टाकल्यामुळें किती वाचकांस वाईट वाटत असेल ! विचित्रपुरींतील पद्मनयनेला किती संकटाच्या राशी भोगाव्या लागल्या ! अशीं संकटें वाचतां वाचतां वाचकांस पुस्तक खालीं ठेवावें लागतें; डोळ्यांतले अश्रु पुसावे लागतात; व कधीं कधीं खेद अतिशय झाल्याकारणानें गोष्ट सोडून द्यावी लागते. घरांत सर्व प्रकारची स्वस्थता असतां, सुखासनीं बसलें असतां, ह्या कल्पित संकटांनीं आपला जीव किती अस्वस्थ होतो. कित्येक म्हणतील अश्या अस्वस्थतेमध्येंच सुख आहे. ' सुखमध्ये स्थितं दुःखं दुःखमध्ये स्थितं सुखं. ' खरें सुख म्हणजे दुःखाचा अभाव. जितक्या दुःखाच्या कल्पना करवतील तितक्या कराव्या, कारण दुःखविमोचन झालें म्हणजेच सुख होतें. विक्रमोर्वशी नाटकांत म्हटलें आहे कीं—

' यदेवोपनतं दुःखात्सुखं तद्रसवन्तरम्
तप्तस्यहि तरुच्छाया निर्वाणाय विशेषतः '

अर्थ—जें सुख दुःखानंतर प्राप्त होतें तें विशेष गोड लागतें; कारण, उन्हांत तापला असेल त्यासच झाडाची थंडगार साउली अधिक सुखावह होते. परंतु पोळलेल्यास पोळवूं नये. डागावर डाग देऊं नये. एक डाग दिलेल्या जागीं दुसरा डाग दिला असतां व्रण होऊन मांस सडतें. तसें एक दुःख संपलें नाहीं तोंच दुसरें संकट घातलें म्हणजे मनास फार खेद होतो. ईश्वराच्या घरीं असा न्याय नाहीं. मुक्तमाला व मोचनगडांतील गंगू ह्यासारिख्या साध्वी स्त्रियांना पृथ्वीवर इतकी संकटें कधीं ही प्राप्त झालीं नाहींत. अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, व दमयंती ह्यांस अशी विपत्ति कधीं आली होती काय ? सीतेस रावणराक्षस घेऊन गेला ह्या पलीकडे वाल्मीकीनें सीतेचे हाल केले नाहींत. त्या नंतर पुनः एकदां तिला आरण्यांत टाकिली, पण ऋषीच्या आश्रमीं तिला नेऊन ठेविलें. सभेंत आणून द्रौपदीचें केशाकर्षण करून तिला नग्न करण्याविषयीं दुःशासनानें प्रयत्न केला परंतु

अत्यंत दुःखग्रस्त होऊन तिनें मोठ्यानें हंबरडा फोडलाः—

'हे कृष्ण द्वारकावासिन् क्वासि यादवनंदन'
'इमामवस्थां संप्राप्तां किं न रक्षसि माधव'

ही आरोळी द्वारकेस ऐकूं जाऊन, श्रीकृष्णानें अनंत हस्तांनीं तिला भरजरी शालू, पाटाव, पैठण्या हीं एकावर एक नेसवलीं. ह्या प्रमाणें द्रौपदीवरचे माहान अरिष्ट जुन्या कवींनीं कसें टाळलें आहे व त्यामुळें त्या कथा वाचणाऱ्या पतिव्रता स्त्रियांस किती आधार येत असेल. परमेश्वर सदा जवळच आहे, व तो अचिंत्य कल्पनेच्या बाहेरच्या उपायांनीं संकट-समयीं आपल्यास सोडवील, असें म्हणण्या पासून अज्ञानांच्या जीवाला मोठा आधार असतो. विद्वानांना तीं विलक्षण संकटें खरीं वाटत नाहींत. असो. कोणावर संकटांच्या राशी आणून वाचणारांस दुःख देणें हें सर्वथैव अश्लाघ्य आहे. अनेक संकटें ऐकवून अंतःकरणें दीन व खिन्न करणें ह्यापेक्षां पुष्कळ उत्साहाच्या शौर्याच्या, धैर्याच्या, प्रौढीच्या, औदार्याच्या गोष्टी सांगून लोकांस जरा उल्हासित करावें हें बरें.

२ नावलामध्यें ह्या सृष्टीचे नैसर्गिक स्वरूपांचें वर्णन असावें. कांहीं वृत्तांतभाग कमजास्त असला अथवा पुरुष विशेषांचीं नांवें खोटीं असलीं, किंवा पुरुष कल्पित असले तरी चिंता नाहीं. परंतु त्यांच्या संबंधानें जी गोष्ट सांगितली असेल ती खरी कोठें तरी झालेली असावी. झालेली नसेल तर संभाव्य व खऱ्या सारखी भासणारी तरी असावी. केवळ अज्ञान लोकांकरितां असेल तर, अद्‍भुताचें मिश्रण असलें तरी चालेल, असें पूर्वी सुचविलेंच आहे. पण इतःपर जीं नावलें होतील त्यांत खऱ्या व संभाव्य गोष्टीच नावलकार घालतील तरच त्यांचीं पुष्कळ बुकें विकून मोठा फायदा होईल. अमुक काळीं अमुक चमत्कारिक गोष्टी झाल्या त्यांचें खरें स्वरूप मनोरंजक रीतीनें वर्णिलें असतां त्याविषयीं चिरकाळ लोकांची अभिरूची राहते. जें सुंदर स्वरूप पृथ्वीवर सांपडण्याचा संभव आहे त्याचेंच वर्णन करावें. जी निष्ठुरता, जें धैर्य, जें साहस, जो मत्सर, जी प्रीति, जी दया मनुष्याच्या हातून होण्यासारिखी आहे तीचेंच वर्णन करावें. आकाश, डोंगर, पहाड, झाडी, नद्या, गुहा, दरे, मैदाने ह्यांचें जसेंच्या तसेंच वर्णन केलें पाहिजे. मनुष्याच्या वर्णनांत देखील कांहीं एक उणें अधिक असतां कामानये. ज्या काळाच्या व ज्या

स्थळाच्या संबंधानें नावल लिहिणें असेल त्या काळीं त्या स्थळीं जशीं माणसें असतील, तशींच नावलांत दाखवलीं पाहिजेत. त्यांचा पोषाक, त्यांची चालचलणूक, त्यांच्या कल्पना जशाच्या तश्या उभ्या केल्या पाहिजेत. नावलांमध्यें हलक्या जातींचे व मध्यम प्रकारचे लोक जितके जास्त घालावे, तितका वर्णनांत स्वाभाविकपणा जास्त येतो असें डिकेन्स वगैरे आलीकडील विलायती नावलकारांचें मत आहे. ते म्हणतात कीं श्रीमंत लोकांमध्यें कपटें फार व कृत्रिमाचें वर्त्तन फार त्या मुळें त्यांच्या खऱ्या भावना लोकांना समजत नाहींत, व भलत्याच पुरुषावर भलता गुण स्थापित करण्याचा विशेष संभव असतो. हें विलायती नावलें लिहिणारांचें मत खरें आहे असें आम्हांस वाटत नाहीं; कारण चोपदारांच्या ललकाऱ्या, भालदारांची बडेजाव, थाटमाट डामडौल, व मोठेपणाचा दिमाक ह्या खालीं सर्व लोक दिपून जातात, व त्यांचें खरें स्वरूप समजत नाहीं हें खरें; परंतु धैर्य शौर्यादि मोठे मोठे गुण मोठ्या लोकांशिवाय इतरांत विरळा सांपडतात. बडे लोकांचें खरें स्वरूप थाटमाटांत लपलेलें असतें तरी कवींना हृदयांत शिरून आतलें बाहेर काढण्याची विलक्षण शक्ति असते, म्हणून खऱ्या स्वाभाविक स्थितीचें वर्णन अवश्य असेल तर त्यांतून श्रीमंत लोक त्याज्य आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. आणखी मध्यम प्रतीचे लोकांचीं व हलकट लोकांचींच वर्णनें लिहिलीं तर तीं ही हलकटच होतील. त्यांत खरें वीर्य, गांभीर्य ह्यांचा लवलेश सांपडणार नाहीं. रांडा कळवंतिणींच्या मस्कऱ्या व उखाळ्या पाखाळ्या, चोरांची लुच्चेगिरीचीं भाषणें ह्यांत काय मौज आहे? अशी मौज पहावयाची असली तर मुंबईत एक दिवशीं मध्यान रात्रीं रस्त्यांतून फिरावें म्हणजे हवी तितकी दृष्टीस पडेल.

एवढ्याकरितां हलकट लोकांचे फारसें वर्णन नको; व श्रीमंत लोकांच्या थाटमाटाच्या वर्णना पासूनही नेहमी आनंद होणार नाहीं. बायको नवऱ्याकडे गेली कीं, हंड्या झुंबरांची गर्दी, पराच्या गाद्या, मखमाली रूजामे, त्यावर डाक्याच्या मलमलीचे सरपोष, किनखापी पडदे, खिडक्यांना भरजरी पडदे, त्यांना गोंड्यासगट रेशमी दोऱ्या, जागोजाग सुंदर चित्रें व तस्बिरा, अयन्याच्या भिंती, बुटेदार छत, त्याजवर झालरी, जडावाचें विड्याचें तबक, त्यांत चौफुला, अत्तरदाणी, गुलाबदाणी, चतुर्दशगुणी तयार केलेले गोविंदविडे, चित्रविचित्र विंझणवारे, दिव्यांचा थाट, मेवा मिठाईचा लाट,

व अत्तरांचा घमघमाट, आणि मंद सुगंध शीतल वाऱ्याची लकेर, इतकें साहित्य बरोबर असावयाचेंच, व जितके वेळ भेटीचा प्रसंग येईल तितके वेळ हेंच कांहीं हेरफेरानें बरोबर जावयाचें. त्याचें वर्णन वारंवार वाचण्यास वाचणारांचा कल होत असेल असें आम्हांस वाटत नाहीं. म्हणून सर्वकाळ श्रीमंती थाटाचें वर्णन असावें असेंही आम्हांस वाटत नाहीं. तात्पर्य जें खरें स्वरूप असेल तेंच जागोजाग वर्णिले पाहिजे.

४ नावलामध्यें कामक्रोधादि मनोद्वेगाचे जे वरचेवर मासले दाखवावे लागतात, ते सर्व मनुष्यजातीमध्यें ज्या सामान्य चिन्हांनीं त्यांचें प्रदर्शन होतें त्या सामान्य चिन्हांनीं दाखवावे. कुंदकलीप्रमाणें दांत, चंपाकलीप्रमाणें नाक, दांतांच्या फटीमधून दांतवणीची काळी रेघ अश्या एकदेशीय चिन्हांनीं स्वरूपाची प्रतिमा अंतःकरणांत उभी रहात नाहीं. लग्नसमारंभांत अथवा दुसऱ्या समारंभांत सांप्रदायिक गोष्टीचा फारसा उल्लेख कामाचा नाहीं, कारण ज्यांस ते सांप्रदाय माहित नसतात त्यांस त्या गोष्टी समजेनाशा होतात व त्यांपासून त्यांस आनंद होत नाहीं. तात्पर्य कोणच्याही विशेष गोष्टीचें फारसें वर्णन कामाचें नाहीं. प्रत्येक देशांत, व प्रत्येक लोकांत पैराव निरनिराळे, व चाली रीति निरनिराळ्या असतात; परंतु आत्मा सर्वांचा एकच आहे. म्हणून आकृतीचे वर्णन करितांना आत्म्याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे.

वर सांगितलेले चार धर्म नावलामध्यें मुख्यत्वें असावे व असे धर्म असले म्हणजे नावलें फार उपयोगी ग्रंथ होतील. त्यांतून खऱ्या पुरुषांचा वृत्तांत असला तर फार उत्तम. इतिहासकारांची माहिती व कवींची कल्पना हीं एकत्र होऊन नावल रुपी ग्रंथ केले असतां किती फायदा होतो! वृत्तांतांमध्यें लांबलचकपणा व कंटाळवाणेपणा असतो त्याचें कारण ज्या बारीक बारीक गोष्टी, त्या टाकून देऊन मुख्य मुख्य ठळक गोष्टी घेऊन कल्पनेच्या तिखट मिठानें नावलरूपी ग्रंथ किती मिष्ट होतील!

नावलरुपी ग्रंथांना खालीं लिहिलेले गुणही अवश्य आहेत.

ज्यापासून वाचकांस उत्तेजन येईल व समाधान वाटेल असा विषय पाहिजे. नावल वाचित असतां वाचक उत्तेजनाची वाटच पाहत असतात. कांहीं विजातीय रीतीनें परस्परांची भेट, कांहीं अनपेक्षित लाभ, फसणूक,

फजीती, घातपात, साहस, शौर्यकृत्य, विघ्न अथवा महा संकट यांपासून वाचकांस एक प्रकारचा आवेश येतो; त्याची त्यांस फार आवड असते. परंतु एकंदर विषय मनोवेधक असला पाहिजे, नाहीं तर वरील गोष्टींपासून फारसा आवेश येत नाहीं. अरबी सुरस गोष्टींतील अद्भुत गोष्टींनीं विद्वानांचें फारसें समाधान होत नाहीं; कारण त्यांच्या खरेपणाविषयीं भरंवसा नसतो, व त्यामुळें त्यांत आस्ता लागत नाहीं. गोष्टी नव्या नव्या असाव्यात म्हणजे आनंद होतो म्हणून देशोदेशच्या गोष्टी आणून नावलांत भराव्या असा एकादा समज होईल; परंतु नव्या नव्याच गोष्टी पाहिजेत असें आम्हांस वाटत नाहीं. कानोकानीं शिवाजीच्या गोष्टी ऐकिल्या, लिहिलेल्या बखरी पाहिल्या, मराठ्यांची बखर वाचली, कवितावद्ध शिवाजीची कहाणी वाचली तरी शिवाजी विषयीं कोणी नावल लिहितील, तर तें लोक उड्या टाकून घेतील. कारण, आपल्या देशांत जे वीर होऊन गेले त्यांविषयीं आपल्या मनांत फार बहुमान असतो व प्रीति असते, हें देशाभिमानाचें महात्म्य. आमची आजी ९० वर्षांची होऊन मेली व तेवढ्या काळांत तिनें अठरा वेळा भारत व भागवत हीं पुराणें ऐकिलीं तरी नेहमीं पुराण ऐकावयास जात असे. ह्याचें कारण ग्रंथांची थोरी. इंग्रजीमध्यें सर वाल्टर स्काटची ऐवेनो, आबट, केनिल्वर्थ नांवाचीं नावले आहेत त्यांतील विषय असाच उत्तेजक व आनंददायक आहे. इंग्लंडाच्या इतिहासांतील प्रसिद्ध पुरुषांचीं त्यांत वर्णनें दिलीं आहेत. नार्मन लोकांचा अतोनात जुलुम, साक्सन लोकांचा स्वतंत्र होण्याविषयीं विलक्षण आवेश, स्त्रियांविषयीं अत्यंत बहुमान, मेरी क्वीन अफ स्काटस् हिची संशयोत्पादक वर्तणूक, व तिचीं अनेक दुःखें, एलिजाबेथशीं अर्ल अफ लीस्टर ह्याचा स्नेह हीं प्रत्येक इंग्लंदांतील मनुष्याच्या हृदयाला भिनलीं आहेत. आमच्या देशांत असे विषय काय थोडे आहेत ? मुसलमानी राज्यांत अनेक शूर पुरुष होऊन गेले. साताऱ्चे राजे, पुण्याचे पेशवे, पेशव्यांच्या पदरचे सरदार, सावंतवाडीचे सावंत, पवार, गाइकवाड, शिंदे, होळकर, जोधपूर जयपूरचे राजे, इत्यादि काय थोडे वर्णनायोग्य लोक आहेत ? हे आलीकडचे लोक अल्प वाटत असले तर पुरातन काळचे अनेक वंशांतील अनेक राजे आहेत. त्यांच्या चरित्रांचा शोध करून त्यां विषयीं कां नावलें लिहूं नयेत ? सांप्रतची सर्व नावलें विषयांच्या दुर्बळते-

मुळें फार लवकर मागें पडतील. मोठ्या जुलुमानें तीं एकवार वाचतात परंतु पुनः वाचण्याची इच्छा होत नाहीं. ह्याचें कारण त्यांतील गोष्टीविषयीं आपल्या मनामध्यें कोणच्याही प्रकारचा सन्मान नाहीं.

नावलांमध्यें किंवा तत्समान ग्रंथांत फारसें पांडित्य, शब्द लालित्य, अथवा फारशी विद्वत्ता हीं कामाचीं नाहींत. मंजुघोषेंत एके ठिकाणीं आहे " वसंतासही संतत उसंत देणारी व-सं-त-मा-ध-व हीं सहा अक्षरें तिचें करण (कर्ण) रंध्रद्वारें शिरून आंतील शुद्धिकंदास जागृत अवस्था देती झालीं. " ह्या वाक्याचा एकाएकी कोणासही अर्थ समजणार नाहीं. एक स्वनाचे शब्द पाहून एकत्र घातले आहेत. त्यांतून फारसा आशयही निघत नाहीं. शुद्धिकंद म्हणजे काय ? शुद्धि म्हणजे मूळ अर्थ स्वच्छता, प्राकृतांत शुद्धि म्हणजे हुशारी घेतात. स्वच्छतेचा अथवा हुशारीचा कांदा म्हणजे काय ? व त्याला जागृत अवस्था म्हणजे काय ? ह्याचें सौरस्य आमच्या अंतःकरण ' कंदांत ' येत नाहीं. अशीं वाक्यें निवडलीं तर अनेक निघतील व विस्तार होईल ह्याकरितां फारसें शब्दलालित्य असूं नये असें आमचें दिग्दर्शन आहे.

गोष्ट फार साधी असावी; त्यांत फार आढेवेढे नसावे. विचित्रपुरी नावलांत व हल्लींच्या बहुतेक नावलांत संविधानकामध्यें गुंतागुंत फार, त्यामुळें त्यांतील गोष्ट समजत नाहीं; व समजली तर ध्यानांत राहत नाहीं. सुलोचना व माधव ह्यांतील गोष्ट बरीच सुलभ आहे. इंग्रजींतील उत्तम नावलें ऐवेनो, आबट, केनिल्वर्थ, क्केन्टिन डर्वर्ड, ह्यांतील गोष्टी फार साध्या आहेत व सहज लक्षांत राहण्या जोग्या आहेत. ज्या गोष्टी लोकांच्या तोंडीं फार, त्यांच्या संबधानें नावल लिहिलें तर त्याची गोष्ट वाचकांस समजते, व त्यांच्या अंतः-करणांस आल्हाद देते.

ह्याप्रमाणें नावलाचे मुख्यमुख्य गुण जे आमच्या लक्षांत आले ते आम्हीं सांगितलें. त्यांत कांहीं सांगावयाचे राहिले असले तर त्यांची विद्वानांनीं पूर्ती करावी. नावलाचें स्वरूप पद्धतवार वर्णिलें नाहीं असें कोणास वाटेल तर त्यांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं अवकाश थोडा, व उद्योग फार, त्यापुढें उपाय नाहीं. काळ, पुरुषस्वभाव, व स्थळ ह्यांचें ऐक्य, वाचकांच्या हृदयांत दया, धैर्य, शौर्य इत्यादि मनोवृत्ती वृद्धिंगत होतील अश्या गोष्टी,

सृष्टींतील नैसर्गिक स्वरूपांचें वर्णन, सर्वसामान्य कामक्रोधादिकांचे मासले, उत्तेजन येईल व समाधान होईल असा विषय, सर्वांस समजण्याजोगे सुलभ शब्द, साधी सोपी गोष्ट, इत्यादि गुणांनीं युक्त अशीं नावलें जर आमचे विद्वान् बंधू लिहूं लागतील तर जगतावर मोठे उपकार होतील. आतांशीं नावलांची कीड फार झाली आहे. लहान मुलें बाळें देखील नावलें लिहून पैसे मिळवूं लागलीं आहेत. ज्या थोड्या नावलांचा आम्ही आज उल्लेख केला तीं, आहेत त्यामध्यें, फार उत्तम अशीं आम्ही समजतों; व त्यांचे कर्ते फार विद्वान अशी आमची पक्की खात्री आहे. परंतु नावलाला अद्याप चांगलें स्वरूप आलें नाहीं असें म्हटल्या वांचून राहवत नाहीं.

***

नाटक म्हणजे काय ?

नाटक म्हणजे हावभावांसह रंगभूमीवर म्हणून दाखवण्यायोग्य कांहीं रसभरित संवादमिश्रित काव्य.

कोणचेहि काव्य हावभावासहित बोलून दाखविणें ह्याची आवड मनुष्यमात्रांस फार पुरातन काळापासून आहे. कितीही अडाणी, रानटी, अज्ञान लोक पाहिले तरी त्यांमध्यें हावभावासहित नक्कल करण्याची कांहींना कांहीं रीत आढळते. अनुकरण करण्याची आवड अगदीं लहान मुलांत देखील सांपडते. मुली व मुलें संसारखेळ खेळत असतात; त्यावेळेस कोणी आई बनते; कोणी सून, कोणी लेक, कोणी नवरीमुलगी, कोणी नाण्हवली, अशीं सर्व प्रकारची सोंगें आणतात. मुलांपैकीं कोणी नवरा, कोणी जांवई, कोणी व्याही, कोणी लहान मूल, अशी सोंगें आणतात. आणि आई आईप्रमाणें, लेक लेकीप्रमाणें, नवरा नवऱ्याप्रमाणें, व मूल मुलाप्रमाणें आचरण करण्याविषयीं आपल्या पोरबुद्धीला सुचतील तितके हावभाव करून होईल तितका प्रयत्न करीत असतात. (अज्ञान अवस्था असो कीं सज्ञान अवस्था असो, सर्व देशांत नाटकरूपी खेळ कमी जास्त प्रकारें सांपडतात.) अज्ञान लोकांमध्यें एकाद्या सणाच्या दिवशीं किंवा उत्सवाच्या दिवशीं नित्याच्या काबाडकष्टांतून मुक्त झालेले गरीब लोक आनंद करितात, व सर्वांना मौज दाखविण्याकरितां देवांचीं अथवा जुन्या वीरांचीं सोंगें घेतात, व तदनरुप नृत्य व हावभाव करितात. शिमग्यांतले वीर पुष्कळांना ठाऊक असतील. उत्तर हिंदुस्थानांत काशीसारख्या शहरांत मोठे मोठे मेळे व मोठमोठ्या यात्रा जमत असतात. त्यांत असंख्य लोक एकत्र मिळून भरतभेट, सीतासंशुद्धि, हे खेळ करित असतात; व ते खेळ तीन तीन दिवस चालतात. फार मोठा उत्सव ! हजारों लोक रामाच्या पाठीमागून जातात व हजारों भरताजवळ असतात ! भेटीसमयीं लोकांच्या अंतःकरणांत प्रेमाचे व आनंदाचे पूर येत असतात. ह्या खेळांतील आनंद व

आविर्भाव अनुपम असतो. पाहिलें नाहीं पण क़ाशी मुक्कामीं ऐकिलें आहे कीं मारुतीच्या सोंगाच्या हातून, इतर मनुष्यांच्या हातून होणार नाहींत, असे चमत्कार होतात. असो, असले खेळ करण्याचा मनुष्यांमध्यें मुळापासून कल आहे. व हा कल पुढें ह्या स्वरूपाला येऊन पोंचला आहे कीं, हल्लीं सर्व लोकांना असल्या खेळांतील संभाषणें एकत्र लिहिली असतां त्याचें उत्तम काव्य होतें असें वाटू लागलें आहे. 'काव्येषु नाटकं काव्यं' ह्या भरतखंडांत कालिदास, भवभूति आदी करून; इंग्लंदांत शेक्स्पीयर; फ्रान्स देशांत रासीन कार्नील; व वाल्तेर, जर्मनींत शिलर; व गीटी, इतलींत आल्फीरी, ग्रीस देशांत साफोक्लीस, युरिपिदीस, व अरिस्टाफनी अश्या महान महान कवींनीं ह्या खेळांताल भाषणें लिहिण्याकडे आपली अगाध बुद्धि खर्चली. कवींची प्रज्वलित बुद्धि, इतिहासकाराचें इतिहासज्ञान, विजातीय चित्रकाराची कला, वक्त्याची विलक्षण मनोवेधकता, नावलकाराचें चातुर्य, व तत्त्ववेत्त्याची गहन बुद्धि इतके गुण एकत्र करावे तेव्हां एका नाटककाराची कल्पना पूर्ण होते. फार पुरातन काळीं नाटकें लिहून तीं रंगभूमीवर करून दाखवण्याचा प्रकार ग्रीस देशांत उद्भवला; व युरोपांतील सर्व देशांत ग्रीशन लोकांनीं लिहिलेलीं नाटकें जाऊन नाटककला पसरली. आपल्या भरतखंडांत रामाच्या वेळेसच नाट्यकला ठाऊक होती असें म्हणतात; व रामाचे मुलगे कुश लव व भरताचीं मुलें रामाला नाटक करून दाखवीत असें म्हणतात. क़दाचित् तीं रामाच्या कथा साभिनय गाऊन दाखवीत असतील. परंतु हें खचित आहे कीं नाटक कला, व नृत्यमिश्रित नाटककला फार दिवसांपासून आपल्या देशांत प्रसिद्ध आहे. ह्या कलेचा मूळ गुरु भरताचार्य.

भरताचार्याचा नाट्यशास्त्र नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्याचा सारांश ह्या ठिकाणीं द्यावा तर फार विस्तार होईल. ह्याकरितां त्यांतील मुख्य मुख्य गोष्टी सांगून इंग्रजी रीतीनें नाटकाचें खरें स्वरूप सांगणें अवश्य आहे; कारण हल्लीं इंग्रजी नाटकें वाचणारे लोक फार, व तदनुरूप नाटकें लिहिणारे लोक पुढें निघतील, असें आम्हांस वाटतें.

भरताचार्य फार पुरातन कालीं झाला. दशरूपाचा कर्ता धनंजय त्याचा भाऊ धनिक, हे खिस्ताच्या १० व्या शतकांत झाले असावे. खिस्त शकाच्या सुमारें १४ व्या शतकांत काव्यप्रकाश वगैरे ग्रंथ झाले असावे.

काव्यप्रकाशकर्ता मम्मट व एक विस्तीर्ण व्याकरण ग्रंथाचा कर्ता कय्यट हे बंधू होते असें म्हणतात. ह्या सुमारास अनेक अलंकारग्रंथ झाले. सुंदरमिश्राचा अभिराममणि, साहित्यदर्पण, नाट्यलोचन, नाट्यप्रदीप, नाट्यदर्पण, रूपचिंतामणि, नाट्यशेखर, नाटकावतार, रायमुकुट, नाटकरत्नकोश, नृत्यसर्वस्व, नृत्यविलास, दंडीचा काव्यादर्श, सरस्वतिकंठाभरण आणि अवलोक असे अनेक अलंकारपर प्राचीन ग्रंथ आहेत. रसगंगाधर, प्रतापरुद्र, कुवलयानंद असे अर्वाचीन ही ग्रंथ पुष्कळ आहेत. त्या सर्वांच्या अनुमतें नाटकाचें जें संस्कृत लक्षण तें एणेंप्रमाणें —

सर्ववृत्तिविनिष्पन्नं । नानावस्थांतराश्रयं
अवस्थानुकृतिर्नाट्यं । रूपं दृश्यतयोच्यते
वाक्यं रसात्मकं काव्यं । काव्यार्थाभिनयो नाट्यं

अर्थ :—सर्व प्रकारच्या स्थितीपासून उत्पन्न झालेलें व त्यांतील निरनिराळ्या अवस्थांना अनुलक्षून जें अवस्थेचें अनुकरण म्हणजे लोकांस तसें सोंग आणून दाखविणें त्याला 'रूप' म्हणावें. हीं रूपें दहा प्रकारचीं. व नाटक हें एक त्यांपैकीं रूप आहे. परंतु सर्व रूपें नाटक शब्दानेंच मोडतात. सामान्यतः नाटक म्हणजे जें वाक्य बोलावयाचें त्याचा अभिनय म्हणजे तदनुकूल हावभाव, हें फारच साधारण लक्षण. ह्यापेक्षां जें इंग्रजींतील लक्षण आम्हीं प्रथम सांगितलें, म्हणजे, 'हाव भावासहित करून दाखवलेलें कांहीं रसभरित संवादमिश्रित काव्य तें नाटक' हें लक्षण बरें आहे. संस्कृतांतील अलंकारग्रंथांत विषय (वस्तु), नायक, व रस ह्या तीन गोष्टी नाटकाला अवश्य आहेत असें म्हटलें आहे. विषय (वस्तु) ऐतिहासिक खरा, कल्पित अथवा कांहीं खरा व कांहीं कल्पित असतो. नाटकामध्यें नायकाचे गुण एणेप्रमाणें असावे. तो विनयसंपन्न; सुस्वभावी; सुस्वरूप; उदार; तत्पर; प्रियभाषी; लोकप्रिय; भक्तिमान; वाक्कुशल; चांगल्या कुळांत झालेला; स्थिर; तरूण; बुद्धि, उत्साह, स्मृति, लवकर आशय समजण्याची शक्ति, कला, व मान इहीं करून युक्त; शूर; दृढ; तेजस्वी; शास्त्रें शिकलेला; व धार्मिक; असा असावा. जी नायिका असावयाची ती नायकाची विवाहित स्त्री असावी, व तिची एकादी सखी अथवा दासी असावी. वेश्या स्त्रीला कधींही नायिका करूं नये. हा नियम फार उत्तम आहे. ह्यावरून आपले पूर्वज किती

पापभीरू होते, हें सहज लक्षांत येईल. इंग्रजींत ड्रायडन व कानग्रीव ह्या कवींची नाटकें ह्या नियमाला विरुद्ध आहेत म्हणून अगदीं अनुपयुक्त झालीं आहेत. मनोरमा नाटकांत ही वेश्या, व व्याभचारी स्त्रिया ह्यांस प्राधान्य दिलें आहे. स्त्रियांचें सौंदर्य कितपत असावें, व त्यांचे गुण कोणचे असावे हें ही नाटक शास्त्रांत सांगितलें आहे. दूती कशा असाव्या, व अन्य पात्रें कशीं असावीं, ह्याविषयींही पुष्कळ सांगितल आहे. परंतु त्यांचा प्रस्तुत विचार करावयास नको. एक विषय किंवा कथा; दुसरें, नायक, नायिका, व इतर पात्रें; आणि तिसरें, नाटकांमध्यें रस असले पाहिजेत. रस मूळचे नऊ आहेत. शृंगार, वीर, करुण, रौद्र, हास्य, भयानक, बीभत्स, अद्भुत, आणि शांत. नाटकांत आठ रस असावे; नवव्याचें प्रयोजन नाहीं असा पुरातन नियम आहे. ह्या रसांच्या स्वरूपांविषयीं फार थोड्यांना माहिती असते, म्हणून एकेकाचीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

शृंगार

शाकुंतल नाटक

इदमुपहितसूक्ष्मग्रंथना स्कंधदेशे
स्तनयुगपरिणाहाच्छादिना वल्कलेन
वपुरभिनवमस्याः पुष्पति स्वां न शोभां
कुसुममिव पिनद्धं पांडुपत्रोदरेण

अर्थ (स्वकृत साक्या)

वल्कलकांचोळीची स्कधी सूक्ष्म ग्रंथिका वाहे
विस्तृत स्तनयुग अतिदुखें ती वल्कलपीडा साहे
शरीरनाजुक परि स्वरूपानें वल्कल कैसे लपवी
फिकटपानामधें गूठलीं कुसुमें भासति जेवी.

शाकुंतल

सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यं
मलिनपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति
इयमधिकमनोज्ञा वल्कलेनापि तन्वी
किमिव हि मधुराणां मंडनं नाकृतीनां

अर्थ

शैवालें जरि पद्मलिप्त तरिही शोभाच त्याला असे
किंवा रम्यचि चंद्रबिंब दिसतें चिन्हें करूनी जसें
तैसी वल्कलयुक्तही अतिशयें रम्या दिसे, भूषण
होतें सर्वहि सुंदरांस न दिसे कांहींच त्या दूषण

वीर

एषत्वामभिनवकंठशोणितार्थी
शार्दूलः पशुमिव हन्मिचेष्टमानं
आर्त्तानां भयमपनतुमात्तधन्वा
दुष्यन्तः स्तवशरण भवत्विदानीं

श्लोक (स्वकृत)

आलों मी अभिनव कंठरक्त प्याया
व्याघ्रापैं लघुपशु मारुनी चिराया ।
आर्तांच्या भयमोचनार्थ घेतलेंकीं
दुष्यंतें धनु भीति सोड शत्रुलोकीं ।।

मुद्राराक्षस

निर्मेघाकाशतुल्य लखलख करिते मत्करप्राप्तखड्या
युद्धश्रद्धेकरूनी पुलकितचि जणों वीरलोकाल्पसंख्या
संग्रामाच्या कसोटीवरि रिपुनि जिची दृष्ट आहे परीक्षा
मित्रस्नेहं मलाही विवश करुनियां साहसीं देउं दीक्षा

करुण

कुमारसंभव काव्य

अयि जीवितनाथ जीवसी त्वभिधायोत्थितया तया पुरः
ददृशे पुरुषाकृतिः क्षितौ हरकोपानलभस्म केवलं

श्लोक (स्वकृत)

अगा प्राणनाथा तुला जीव आहे ।
म्हणूनी असें ऊठली कामजाये ।।
तयीं आपला काम तो भस्मरूपी ।
शिवाच्या क्रुधेनें जळाला विलोकी.

मालतीला उद्देशून माधव म्हणतो

वारंवार निघोनि झांकित असे हें बाष्पनेत्रांप्रति
तीची मूर्ति मनांत येउन हरी मद्देहभानाप्रति
काढावी तरि हस्त घर्मसलिलें हो व्याप्त कंपोद्गमें
बोटें कांपति, काय मी करुं अतां कांहीं न मातें गमें

हास्य

नानाफडणीसांना सिंहगडावर टाकलें होतें, व सखारामबापू सास्वडामध्यें कामकाज पाहत होते. सखारामबापू बहुधा नानाची मसलत घेत असत. एकदां एक तेलंग भिक्षुक कांहीं दक्षिणा मागावयास बापूंकडे आला. त्याला बापूंनीं सांगितलें कीं ‘ भटजी तुम्ही नाना फडणिसांकडे जा म्हणजे तुमचें काम होईल. ’ तो भिक्षुक ब्राह्मण सिंहगडावर नानांकडे गेला. नाना म्हणाले, ‘ भटजी मला कैदेंत टाकलें आहे, मजकडे काय आहे ? तुम्ही सखाराम-बापूकडे जा. ’ तो बिचारा भट पुनः सास्वडास आला, त्याला बापू म्हणतात, ‘ भटजी तुम्हाला दक्षिणा मिळावी असें नानांच्या मनांत आलें तरच तुमचें काम होईल. ’ तेलंग भटजी बसून काय करतात ? पुनः सिंहगडास चालले व वाटेनें म्हणतात :—

गडाच्च सास्वडं यामि । सास्वडाच्च पुनर्गडं
गडसास्वडयोर्मध्ये । द्राविडो लुडबडाम्यहं

गरीबाची अशीच हेटाळणी चालते.

चंद्रगुप्ताला म्हणजे मौर्याला राज्यावर बसवल्यावर नंदाचे मंत्री राक्षस वगैरे ह्यांचा उपहास करून चाणक्य म्हणतो.

उपहासपर श्लोक

ते मंत्री वक्रनासादिक असुनि महा नीतिमंत प्रतापी ।
त्यांच्याने नंदलक्ष्मी स्थिर न करवली भ्रष्ट होतां कदापि ।
ती आतां चंद्रकान्तीसदृश शशिसमर्यी चंद्रगुप्तीं मिळाली
तीतें घ्याया समर्थ प्रबल सुत असा कोणती माय व्यालीं

अद्भुत पर्वताचें वर्णन

आलिंगी मेघमाला म्हणुनि अति निळा जो दिसे उंच शृंगें
ज्याचीं भेदोनि गेलीं गगन; शिखिकुलें मत्त हर्षप्रसंगें

भयानक

उल्कामुखांचीं एथें भूतें। भयासूर असतीं अगणितें ॥
पसरोनियां वक्त्रदरीतें। इकडे तिकडे धांवती.
ह्यांच्या दाढा अति विक्राळा। जिव्हा हालविती ळळाळळा ॥
ज्यांच्या मुखांतोनि निघती ज्वाळा। पाहतां वीरांही भयवाटे ॥
केव्हां दिसती केव्हां न दिसती। कितीक अत्यंत शुष्क असती ॥
केश आणि नेत्रपंक्ति। आरक्त यांचा विजेपरि।

पडला एथें अंधकार। जेणें व्यापिलें दिगंतर ॥
खचून गेलें कीं हें अंबर॥ कांहीं एथें दिसेना ॥

आकाशास तमालगुच्छसदृश व्यापी तमःसंगहा
पृथ्वी ही दिसती जणों नवजलामाजी बुडाली पहा
प्रारंभीच वनामध्यें करितसे काळोख भारी निशा
वाटे धूरचि वायुनें पसरुनी व्यापूनि गेल्या दिशा

बीभत्स

फाडफाडोनी कातडें। उपसोनियां सारीं हाडें।
ओढोनियां आंतडें। पिशाच मांस भक्षिती, ॥
हृत्कमलांच्या घालोनि माळा। रक्त कुंकुम लाविती भाळा।
आतड्याचीं करोनि गळां

रौद्र

भीम हातपाय आपटून म्हणतो.

लाक्षागृहानलविषान्नसभाप्रवेशैः
प्राणेषु वित्तनिचयेषु च नः प्रहृत्य
आकृष्टपांडववधूपरिधानकेशाः
स्वस्था भवंतु मयि जीवति धार्तराष्ट्र्यः

(स्वकृत श्लोक)

लाक्षागृहीं सकल घालुनि जाळियेले
अन्नांत वीष मिसळूनिच खावविलें
नेऊन क्षत्रियसभेंत विषादवीलें
प्राणासि फार छळूनी धन हारवीलें

ओढूनि एकवसनाचि सभेंत नेली
दुष्टें सुशील वनिता कचकृष्ट केली
हे हाल होऊनि तिचे कुरु स्वस्थ होतीं
मारीन त्यांसि तरि प्रज्वलित स्वहेती
चाणक्य म्हणतो.
माझ्या बद्धशिखेस हात अणखी सोडावयां धांवतों
तैसा पायहि हा पुनः पण करायाला पुढें चालतो
नंदप्राणविनाशनें शमित जो क्रोधाग्नि माझा तया
मूर्खा पेटवुनी पुनः यमगृहीं जासी कसा दुर्नया

नववा शांतरस कुठें कुठें अढळतो, परंतु नाटकांत नसावा असें कित्येक लोक म्हणतात. आमचा समज आहे कीं नाटकांत शांत रसाचाही मासला असावा.

शांत रसाचें उदाहरण

संतांचें पुण्य वाढो आणि सकळही पाप पावो लयातें
पृथ्वी पाळोत राजे सतत धरुनियां राजकीया नयातें
काळीं देवोत वृष्टी जलद जन सदा साधु सच्छास्त्रसंगें
संपत्संतानलाभें अतिमुदित असो सत्कथांच्या प्रसंगें

सद्विषय, उत्तम पात्रें, व रस ही सामग्री असली म्हणजे अलंकारशास्त्राप्रमाणें नाटक पूर्ण होतें.

जी नाटककला सर्व युरोपांत व अमेरिकेंत पसरली आहे, तिचें मूळ ग्रीसदेशांत उत्पन्न झालें. ग्रीस देशांत साफोक्लीस, यूरिपिडीस, मिनान्डर, एश्चायलस्, अरिस्टाफेनीस असे मोठमोठे नाटककार होऊन गेले. ह्यांनीं जीं नाटकें रचलीं तीं विषयाच्या संबंधानें दोन प्रकारचीं आहेत. कामेदी म्हणजे शृंगार, विनोद, व हास्य इहींकरून युक्त नाटक व ट्राजेडी म्हणजे रौद्र, भयानक, करूण, क्रोध व बीभत्स म्हणजे, घातपात, शोक, अरिष्ट, व मृत्यु इहींकरून युक्त असें नाटक. अरिस्टाफेनीस व मिनांडर ह्यांचीं दुसऱ्या प्रतीचीं नाटकें आहेत व एश्चायलीस, साफोक्लीस, ह्यांचीं दुसऱ्या प्रतीचीं नाटकें आहेत. ह्यांपासून पुढें रोमन लोकांत नाटकांचा प्रचार पडला. त्या देशांत सेनेकानामें एक मोठा विद्वान झाला. त्यानें मात्र ट्राजिडी म्हणून जो प्रकार सांगितला त्या तऱ्हेचीं

नाटकें रचिलीं आहेत. कामेडी म्हणून जो प्रकार वर सांगितला, त्या प्रकारचीं नाटकें लाटिन भाषेमध्ये फार उत्तम आहेत. प्लातस कवीच्या नाटकांत रीती भातींचीं वर्णनें, थट्टा मस्करी, व दोषाविष्करण हीं उत्तम प्रकारें केलीं आहेत. रोमन लोकांच्या संबंधानें हें एक सांगितलें पाहिजे कीं नाटकी लोक, म्हणजे सोंग घेणारे लोक, ह्यांना आपण आपल्या देशांत जसें आज पावेतों तुच्छ मानीत आलों, तसेंच सोंग घेण्याचें काम फार निंद्य, असें रोमन लोक मानीत असत. ह्याचें कारण असें असलें पाहिजे कीं आपल्या लोकांत, तसेंच त्यांच्या लोकांत हलकट तमासगीर जसे नाना प्रकारचे तमाशे करून दाखवितात, तसे नाटकी, अशी त्यांची समजूत झाली असावी. परंतु ग्रीस देशांत सोंग घेणें अगदीं वाईट नाहीं असें लोक मानीत असले पाहिजेत. कारण अरिस्टाफेनीस स्वतः सोंग घेत असे. व यूरिपिडीस स्वतः बायकोचें सोंग घेत असे. भरतखंडांत देखील पूर्वी सोंग घेण्याविषयीं फार तिरस्कार होता असें वाटत नाहीं, कारण रामलक्ष्मणासमोर त्यांच्या मुलांनीं नाटकें केलीं अशी कथा आहे. शिव स्वतः कुटुंबासुद्धां तांडव नृत्य करितात, व विष्णूंनीं मोहनीचें सोंग घेतलें होतें अशा कथा आहेत. असो, नाटकांत क्षणभर रूपांतर केल्यावरून मानहानि कां व्हावी हें आम्हांस समजत नाहीं. नटाचा धंदा कदाचित् करूं नये, परंतु मित्रांच्या व सभ्यांच्या मनोरंजनाकरितां घटकाभर वीर पुरुषांचा आविर्भाव आणला असतां हरकत नाहीं, असें आम्हांस वाटतें.

ग्रीस देशांतील व इटलीमधील नाटकाच्या स्वरूपांमध्यें पुढें पुष्कळ फेरबदल झाला. पूर्वीच्या नाटकांतून वाईट, निंद्य व बीभत्स जेवढें होतें तेवढें सर्व अर्वाचीन नाटकांमधून नाहींसें झालें. ह्याचें कारण ख्रिस्ति धर्म. जुन्या ग्रीशन देवाचीं दुष्कृत्यें, त्यांच्या मारामाऱ्या, देवी म्हणून ज्यांस ग्रीक व रोमन लोक समजत असत, त्यांचे दुराचार, व त्यांबद्दल देवांचे मत्सर व तंटे ख्रिस्तिधर्मानुयायी लोकांना आवडेनासे झाले, त्यामुळें नाटकाला अगदीं नवें स्वरूप आलें.

अर्वाचीन नाटक

ह्या प्रकरणाच्या आरंभीं सांगितल्याप्रमाणें नाटकाचें जें मूळचें, म्हणजे अडाणी स्थितींतलें जें स्वरूप, त्याविषयीं सर्व युरोपांतील देशांतल्या लोकांस अभिरुचि होती. मूळच्या नाटकांत धर्मसंबंध फार असे, व तसलीं नाटकें

धर्माचें मुख्य अधिष्ठान जो देश, त्या इटली देशांत प्रथम उत्पन्न झालीं. तीं नाटकें, म्हणजे ख्रिस्ताला शुळावर चढवला वगैरे गोष्टी, नाटक रूपानें करून दाखवून मूर्तिपूजकांचें मन ख्रिस्तधर्माकडे वळवण्याविषयीं धार्मिक लोकांची इच्छा असे. फ्रान्स देशांत तेराव्या शतकापासून नाटकें होत आहेत असें कित्येक म्हणतात. असेल, पण ब्रिटन देशांत बऱ्याच जुन्या काळापासून नाटकें तयार होत आहेत. तेराव्या शतकांत एक संवादरूपी काव्य झालें. तें रंगभूमीवर म्हणून दाखवीत असत. पण पुढें १६ व्या शतकांत नाटकरूपी ग्रंथ बरेच उदयास आले. त्यावेळेस नाटकें होत. त्यांत कांहीं राजकीय हेतु असे; व वडे लोक तसल्या नाटकांना फार मान देत. राज्यांत अंधाधुंदी व लांच खाणें कितपत आहे, हें उघडकीस आणण्याकारितां ५ व्या जेम्साच्या राज्यांत एक खेळ तयार झाला होता. तो पाहण्याकरितां राजा व राणी हीं स्वतः तीनदां गेली होतीं. अश्या प्रकारचीं नाटकें करण्याची हल्लीं परवानगी असती तर राज्यांतली अंधाधुंदी मोडण्याचा पुष्कळ संभव राहता. असो, त्या काळीं अशीं विनोदपर व हास्यपर नाटकें पुष्कळ होत. परंतु १५ व्या व १६ व्या शतकांमध्यें एक ‘ कामेडी ’ व ‘ ट्राजिडी ’ ह्याहून तिसऱ्या प्रकारचें नाटक उत्पन्न झालें. त्याला ‘ हिस्टारिकल ’ म्हणजे ऐतिहासिक असें नांव दिलें आहे. ह्या प्रकारचें नाटक प्रथम चार्लस विरार्डो ह्यानें ग्रानडामध्यें मूर लोकांचा अपजय ह्या विषयावर रचिलें. हीं ऐतिहासिक नाटकें इतिहासाला फारशीं धरून असत, असें नाहीं. त्यांत कवीच्या पदरचें कांहीं तिखटमीठ पडलें आहे हें स्पष्टच आहे. हीं जशीं खऱ्या इतिहासांतल्या गोष्टींचीं नाटकें, तशीं खोट्या गोष्टी कल्पून व खोटा इतिहास बनवून त्या विषयींचीं नाटकें पुढें होऊं लागलीं. ह्या गोष्टींच्या नाटकांपासून लोकांस फार मौज वाटूं लागली. जागोजाग आश्चर्यस्थळें, उत्साह, व खऱ्या सृष्टीची प्रतिमा लोकांच्या डोळ्यापुढें उभी राही. इंग्लंडांत व इतर युरोपांतील सुधारलेल्या देशांत स्त्रिया म्हणजे देव, त्यांचा मान सर्वांनीं राखला पाहिजे, कोणीं मानहानि केली असतां त्याचा तत्काळ प्राण घ्यावा, असें फार दिवस एक वेड मातलें होतें; व त्याच्या खुणा अद्याप युरोपीयन लोकांत दिसून येतात. ह्या स्वभावामुळें त्यांच्यामध्यें शौर्य व धारिष्ट, हे गुण उत्पन्न झाले होते; व अशा सौंदर्यसंपन्न खऱ्या किंवा कल्पित

नायकांच्या संबंधानें जीं नाटकें लिहिलीं आहेत तीं फार आनंददायक आहेत. कारण, शृंगार, वीर, करुण इत्यादि नवरसांचे मासले त्या शूर पुरुषांच्या चरित्रांत दाखवितां आले. जुन्या नाटकांतून, स्त्रीपुरुषांची प्रीति दाखवायाची असली तर ती केवळ विषयोपभोगाच्या संबंधानें दाखवीत; व स्त्रियांच्या सुंदर देहांवरून त्यांची किंमत करीत असें समजतें. स्त्रीच्या अंतःकरणांतले संकल्प विकल्प, इच्छा, प्रीति, ममता व स्नेह ह्यांचा ते फारसा विचार करीत नसत, आणि त्यामुळें स्त्रियांविषयीं फारसा मान प्राचीन लोकांमध्यें नसे. पण हल्लीं पुरुषांच्या मनोवृत्तीमध्यें फेरफार झाल्यामुळें स्त्रियांची योग्यता उत्तरोत्तर वाढत चालली आहे; व पुष्कळ अंशीं स्त्रियांचें अबलात्व जाऊन सबलत्व येण्याची चिन्हें दिसत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे.

फ्रान्स देशांत पुढें कार्नील कवीनें नाटकांची पुष्कळ सुधारणा केली. इंग्लंदांत ऐतिहासिक नाटकांची फार आवड उत्पन्न झाली व त्यांनीं स्पेन देशांतील पुष्कळ रीति भाती, व गोष्टी आपल्या नाटकांत घेतल्या. इलिजाबेथ राणीच्या राज्यांत स्पेनच्या फिलीपाशीं पुष्कळ लढाया झाल्या त्यामुळें, व मेरी, इलिजाबेथची वडील बहिण, हिच्या वेळेस दोन्ही देशांचा निकट संबंध झाला ह्यामुळें, इंग्लिश लोकांना स्पानिश लोकांपासून पुष्कळ गोष्टी घेतां आल्या; व त्यांवरून इंग्रजी नाटकांत सुधारणा करतां आली. इतली देश सर्व नवीन प्रकारच्या नाटकांचें जन्मस्थान, असें कित्येक लोक म्हणतात. इतलीमध्यें नाटकांचा एक चवथा प्रकार उत्पन्न झाला त्याला 'आपेरा' असें म्हणतात. 'आपेरा' म्हणजे नृत्य व गायन हींच ज्यांत प्रधान आहेत अशीं नाटकें. आपल्या देशांतील तमाशांची बरीच सुधारण केली तर त्यांस आपेराची योग्यता येईल असें आम्हांस वाटतें. अशा जातीच्या आपेऱ्यानें मनाचें रंजन होतें एवढेंच नाहीं; पण पोषाकांनीं व गायनानें मन अगदीं लुब्ध होऊन जातें. हिंदुस्थानांतील अथवा भरतखंडांतील नाटकाचा इतिहास फार थोडा आहे. संवादरूपानें लिहिलेलीं अशीं पुराणें पुष्कळ, आदि काव्य रामायण हें एक नाटकासारिखेंच आहे. निबंधाच्या पहिल्या प्रकरणांत रामायण-भारतांना नावलें असें नांव दिलें. नाटक म्हणजे नावलाचें अन्य स्वरूप आहे असेंही आम्हीं पूर्वीं म्हटलें ह्याचें कारण, जसें नाटकांत तसें नावलांत, विषय, नायक, व रस ह्यांची आपेक्षा आहेच. भेद इतकाच कीं,

नावलांमध्यें पुष्कळ दिवस चालणाऱ्या वृत्तांताची लांबलचक गद्यात्मक हकीकत असते; व नाटकामध्यें मोठ्या इतिहासांतून निवडून घेतलेली थोड्या दिवसांची हकीकत असते. त्यांत चमत्कार तेवढे वर्णिलेले असतात, व बाकीचा कंटाळवाणा वृत्तांत वगळलेला असतो. सर्व भारतापैकीं नारायण भट्टानें १०–१५ दिवसांचा वृत्तांत वेणीसंहार नाटकांत घेतला आहे. मुद्राराक्षस नाटकांत सर्व मौर्यवंशाच्या वृत्तांतापैकीं व नंदाच्या वृत्तांतापैकीं चाणक्य व राक्षस ह्या मंत्र्यांच्या संबंधानें जेवढीं कपटें झालीं, तेवढ्यांची हकीकत घेतली आहे. उत्तररामचरित्रांत शेवटीं सीता अरण्यांत घालविली तेव्हां काय झालें, तेवढ्याचें वर्णन आहे. शाकुंतल नाटकांत शकुंतलेची व दुष्यंताची भेट व त्या नंतर दुष्यंतानें शकुंतलेचें निर्भर्त्सन केलें ह्याचेंच मुख्यत्वें वर्णन आहे विक्रमोर्वशींत, सगळ्या पुरुरवसचरित्रापैकीं त्याची व उर्वशीची गाठ, व तदनंतर तिचें अदृश्य होणें ह्याविषयीं वर्णन आहे. असें प्रत्येक नाटकांत कांहीं अल्प कालांत झालेल्या चमत्कारांचें वर्णन असतें. (प्रथम पुराणासारिखें कोणी तरी लांब चरित्र लिहितो. त्यांतून एकादा चमत्कारिक भाग घेऊन नाटककार त्याचें नाटक बनवितो. भाषणें जणूं प्रत्यक्ष व स्वाभाविकपणें होत आहेत असें दाखविण्याकरितां कांहीं गद्यात्मक भाग घालतो, व मनाला प्रौढी व उल्हास आणण्याकरितां कांहीं पद्यें घालतो; त्या ग्रंथास नाटकसंज्ञा प्राप्त होते.) ह्या करितां नाटक नावलांपासून उत्पन्न झालें असें म्हणण्यास काय हरकत आहे? डाक्तर भाऊ म्हणतात कीं कालिदास अथवा मंत्रिगुप्त ख्रिस्ताच्या ६ व्या शतकांत झाला. त्या पूर्वीं कोणी नाटककार झाले कीं नाहीं हें माहित नाहीं. पुढें ८०० पासून ११ व्या शतका पर्यंतच्या अवकाशांत भवभूति, श्रीहर्ष वगैरे पुष्कळ मोठमोठे कवी व नाटककार होऊन गेले. त्यांच्या नाटकांचा ‘ कामेडी ’ व ‘ ट्राजेडी ’ असा भेद करतां येत नाहीं, तरी त्यांचीं नाटकें बहुतेक ‘ कामेडीच ’ आहेत. संस्कृत नाटकांचे उलट असे नियम आहेत कीं, रंगभूमीवर घात, पात, मृत्यु, मैथुन, शिव्याशाप, तुंबल युद्ध, आणि सामान्य गोष्टींपैकीं चावणें, ओरखडणें, मुका घेणें, खाणें, निजणें, नाहणें व लग्नसोहाळे, ह्या गोष्टी होऊं नयेत. ह्यामुळें सर्व नाटकांना कामेडीचें रूप आलें आहे, त्यांत वृत्तांतभाग आहेत म्हणून त्यांस ‘ हिस्टारिकल कामेडी ’

म्हणजे ' ऐतिहासिक शृंगारपर नाटक ' असें म्हटलें असतां चालेल; परंतु ह्यापैकीं बहुतेक नाटकें अत्यंत मनोवेधक व चित्ताला आल्हाद देणारीं आहेत. इंग्रजीमध्यें शेक्स्पीयर कवीची जी थोरी, तीच आपले कालिदास व भवभूती ह्यांची योग्यता. शेक्स्पीयर कवींमध्यें एवढें जास्त आहे कीं त्यानें अनेक गोष्टी विषयीं नाटकें लिहिलीं. एकंदर ३६ नाटकें लिहिलीं, त्यामुळें नाना प्रकारचे विषय त्याच्या हातून गेले, व त्याला अनेक चमत्कार करतां आले. त्याच्या नाटकांत ' ट्राजिडी ' जातीचीं जीं आहेत, त्यामध्यें फार गंभीर कल्पना, थोर आवेश, लोकोत्तर धैर्य, शौर्य, व औदार्य, व जे गुण जितके ह्या सृष्टींत दृष्टीस पडण्याचा संभव आहे, तितके मोठ्या चतुराईनें त्यानें वर्णिले आहेत; आणि प्रत्यक्ष सृष्टि मनोरुपी मुशींत घालून तिच्या हव्यातश्या प्रतिमा ओतून काढल्या आहेत. अशा कवींचे अवतार फार थोडे. कोणी नवीन विद्वान नाटक लिहूं म्हणेल तर त्यानें प्रथम इंग्रजींत शेक्स्पीयर व तत्समान कवि ह्यांचीं, व संस्कृतांत कालिदासप्रभृति कवींचीं काव्यें वाचून मोठमोठ्या कल्पना प्रसवण्याची मनाला शक्ति आणली पाहिजे. व खालीं लिहिलेले थोडे नियम हीं लक्षांत ठेविले पाहिजेत.

।१ नाटकामध्यें अनेक गोष्टी घालून उपयोग नाहीं कारण तितक्या गोष्टीकडे लक्ष ठेविलें असतां तें वाटलें जातें व मुख्य नायकाला किंवा नायिकेला गौणता येते. मुख्य पात्राच्या गोष्टीला साधनीभूत दुसऱ्या गोष्टी घातल्या असतां चिंता नाहीं. अथेलो नाटकांत बायंकाची गोष्ट व एमिलियाची गोष्ट डेस्डिमोनाच्या गोष्टीला साधनी भूत आहेत. मर्चेंट अन्ड् वेनीसमध्यें अन्तोनियोची गोष्ट पोर्शियेच्या गोष्टीला अंगभूत आहे. किंगलियराच्या तिन्ही मुलींचे वृत्तांत बापाच्या वृत्तांताला अंगभूत आहेत. त्यांचे निरनिराळे इतिहास नाहींत. एकाचाच इतिहास स्पष्ट होण्यासाठीं जेथें जेथें दुसऱ्या पात्रांचा इतिहास अवश्य असेल, तेथें तो थोडक्यांत योग्य रीतीनें दिला पाहिजे. उत्तररामचरितांत कुशलवांचे वृत्तांत किती थोडक्यांत आले आहेत, व ते देखील अखेरीस राम व सीता ह्यांच्या भेटीकरितां आणले आहेत. शाकुंतलांत सर्वदमनाचा वृत्तांत दुष्यंताच्या व शकुंतलेच्या भेटीकरितां कसा साधनीभूत केला आहे. ।कोणच्याही नाटकांत मुख्य पात्र एकीकडे ठेऊन दुसऱ्या गौण पात्रांच्या वृत्तांताचा धागा फार लांब ओढीत

नेतां कामां नये. आलीकडे झालेल्या मनोरमा नाटकांत, कुशी, गंगू, ठकू, गोदी, अशा चार मुली व आणखीही कांहीं मुली आहेत. त्यांत कुशीचें मनोरमा नांव ठेऊन तिला मुख्य नायिका केली आहे. परंतु दुसऱ्या तीन मुलींचें ही वृत्त अव्वलपासून आखेर पावेतों ओढीत नेलें आहे, व जागोजाग त्यांचें इतकें वर्णन केलें आहे कीं, नाटकांत मुख्य नायिका कोण, व उद्देश काय, हें शेवटचें दोन प्रवेश वाचींपर्यंत लक्षांत येत नाहीं. पुनर्विवाह अवश्य आहे असें दाखविणें होतें तर, मुख्य पात्रावरचा तो प्रसंग फार चमत्कारिक रीतीनें टाळला आहे ! मुख्य पात्रावर तो प्रसंग आणून पुनर्विवाह करविला असता तर उद्देश विशेष सफळ झाला असता. व्यभिचारी स्त्रियांना पुनर्विवाह पाहिजे असें दाखविण्यांत फारसें पुनर्विवाहाचें महत्त्व राहत नाहीं. स्वैरसकेशा नाटकांत असाच गोंधळ आहे. मुख्य पात्र किंवा नायक कोण, हें कांहींच लक्षांत येत नाहीं. नाटकाचें नांवही विचित्र ! नवरा मेल्यावर जितक्या स्त्रिया आपल्या खुशीनें केंस राखतात तितक्यांचा त्यांत वृत्तांत, असें नांवावरून कोणास वाटेल. कोणी म्हणेल कीं एक मुख्य पात्राच्या संबंधानेंच नाटक लिहिलें असतां कंटाळवाणें होईल, ह्या करितां पांच चार भिन्न गोष्टी पाहिजेत. परंतु नाटक करून दाखविण्यामध्यें सदाचरणाची प्रौढी, दुराचाऱ्यांस शिक्षा, द्रव्य लोभापासून परिणाम, व्यभिचाराचें फळ, दुखितांचें दुःख निवारण, जुलुम करण्याबद्दल शासन, किंवा नायकाची नायिकेवर विलक्षण प्रीति, असा कांहीं तरी एक उद्देश पाहिजे, नाहीं तर चित्त व्यग्र होऊन जातें. सर्व प्रकारचें वैचित्र्य ह्या जगतांत आहेच, त्यांतून एक गोष्टीला प्राधान्य देऊन ती नाटककारानें नाटकांत वर्णावी, व नाटकसमयीं सर्वांच्या मनोवृत्तींत फेरफार होऊं देऊं नये. कथेकऱ्यानें शोकरसपरिपूर्ण अनुसंधान लावलें व मध्येंच अजागळासारखें कांहीं भाषण केलें तर कसा रसभंग होईल ! तसें अनेकविध गोष्टी एकत्र केल्यानें रसभंग होतो.

२. नाटकाचा विषय फार प्रौढ असावा. थोर पुरुषाचें आचरण, पतिव्रता स्त्रियांचा दृढ निश्चय, शूर पुरुषांचीं साहसें, साधूंचीं चरित्रें, उदार पुरुषाचें वर्तन, एकाद्या थोर मनुष्याचा वध, सुंदर स्त्रीपुरुषांची परस्पर प्रीति व त्यांचा विघाड, ह्या प्रकारचे विषय नाटकाला फार उत्तम. परंतु विषय कसाही असला तरी त्याचें स्वरूप पात्रांच्या कृतीवरून स्पष्ट झालें पाहिजे. ग्रंथकर्त्यानें त्याचें

वर्णन देउन उपयोग नाहीं. पात्रांच्या तोंडानें त्याचें फारसें वर्णन देववूनही उपयोग नाहीं. पात्रांनीं आपण आपल्याशीं बोलूनही आपल्या स्वभावाविषयीं किंवा मनोरथाविषयीं व्याख्यान देणें शोभत नाहीं. मनोरमा व स्वैरसकेशा ह्या नाटकांत पात्राचें 'सलिलोकी' म्हणजे स्वतःशीं भाषण फार ठिकाणीं दिलें आहे, त्यामुळें त्यांतला नाटकपणा कांहीं अंशीं कमी झाला आहे. संस्कृत नाटकांत व इंग्रजी नाटकांत हें आत्मगत भाषण फार थोडे ठिकाणीं आढळतें. उत्तररामचरितांत जरा फार आहे. परंतु आमचें मत असें आहे कीं कृति करून दाखविल्यानें जशी कोणचीही गोष्ट ठसते, तशी पोकळ ब्रह्मज्ञानानें ठसत नाहीं. तसेंच नाटकांतही पात्राच्या तोंडानें कोणची गोष्ट वदवल्यापेक्षां त्याचे हातून घडवण्याचा प्रसंग आणावा. आणखी,

३. जे विषय नाटकांत वर्णावयाचे ते असे असावे कीं त्या पासून मनाची सुधारणा होईल. थोर पुरुषांचीं चरित्रें वाचल्यापासून मन थोर होतें. शूर व धीर पुरुषांचें चरित्र ऐकिल्यापासून अंतःकरणास शौर्य व धैर्य येतें, साधूंच्या चरित्रांपासून वाचकांच्या अंगीं साधुत्व निपजतें, सुनीति व सद्गुण ह्यांचें वर्णन करणें असल्यास सुनीतीचीं व सद्गुणांचीं उदाहरणें दिलीं पाहिजेत. दुराचारी म्हणजे चोर, दगलबाज, लबाड, व व्यभिचारी ह्या लोकांच्या वर्णनापासून सदाचाराची थोरी काय समजणार आहे? आणखी, ज्या लोकांना दुराचाराचा गंधही नाहीं त्यांच्यापुढें दुराचारी लोकांच्या प्रतिमा उभ्या केल्या असतां त्यांस तिरस्कार येतो, व वर्णनांचाही ते तिरस्कार करितात. आणखी, दुराचाऱ्यांस शासन करण्यापेक्षां सदाचारापासून चांगले परिणाम होतात ते वर्णिले असतां, व सदाचारी लोकांची वाखाणणी केली असतां, चांगुलपणाचें विशेष प्राबल्य होतें. शाळेमध्यें दुष्ट, आळशी, व खोडकर मुलांस शासन करण्यापेक्षां, सुस्वभावी उद्योगी व विनयसंपन्न अशा मुलांस बक्षीस दिल्यापासून विशेष कार्य होतें. ह्याकरितां दुष्ट व हलकट लोकांचा नाटकामध्यें फारसा उल्लेख असूं नये. त्यांपासून अज्ञान वाचणारांचें मन बिघडतें, व सज्ञान वाचणारांस वीट येतो. मनोरमा व स्वैरसकेशा ह्या नाटकांत हलकटपणाचा व दुष्टवर्तनाचा कडेलोट केला आहे. नीच, कपटी, व्यभिचारी लोकांची एक मालिकाच लावली आहे. चांगल्या कुळांतली गंगी सोद्याच्या हातीं कराचीस काढून नेऊन, तिला कस्बीण करून, तिचे करवीं फार निंद्य कर्मे करवून,

29673

मद्यपानाच्या योगानें तिचा सर्वस्वी नाश केला आहे. व त्या तिच्या नीच अवस्थेचें मोठ्या रसिकपणानें वर्णन केलें आहे. तसेंच गोदीचा नाऱ्याशीं समागम सांगून तिच्याहातीं गर्भपात करविला आहे. ठकीची तीच अवस्था. सरस्वतीबाई कुटणीचे किती रसिकतेनें वर्णन केलें आहे! स्त्रियांचीं अशीं वर्णनें ऐकून पुरुषांच्या मनाला देखील खेद होतो. बायकांना तिटकारा येईल ह्यांत नवल काय? साध्वी स्त्रिया तर असलीं पुस्तकें फाडून चुलींत टाकतील. स्वैरसकेशा नाटकांतील कालकशास्त्री काय सद्गुणी मनुष्य!! सर्व दुर्गुणांनीं संपन्न!! हवें तें निंद्य व नीच कर्म करितो, व त्याला नाटकांतलें एक मुख्य पात्र केलें आहे. व त्याच मासल्याचीं सर्व पात्रें आणलेलीं आहेत. तोंडातून काढूं नयेत असे अवाच्य शब्द ह्या नाटकांत, आणि तसल्या नाटकाची दुसरी आवृत्ति लवकरच निघणार आहे असें आम्हीं ऐकितों!! सुनीतीचा व सद्गुणांचा उत्तरोत्तर लोप होत चालला आहे असें एक म्हटलें पाहिजे; अथवा सर्व तमासगीरांनी त्या पुस्तकाच्या प्रती घेतल्या असें म्हटलें पाहिजे. सारांश सभ्य लोकांनीं वाचण्याजोगीं हीं नाटकें बिलकुल नाहींत, व आमचे विद्वान बंधू असलीं नाटकें रचण्याकडे आपला अमूल्य वेळ खर्च करणार नाहींत अशी आशा आहे.

४. नाटकांमध्यें स्थलाचें ऐक्य असलें पाहिजे; व काळाचें ऐक्य असलें पाहिजे. स्थलाचें ऐक्य म्हटलें म्हणजे, एक गोष्ट एकच ठिकाणीं झालेली पाहिजे, ती चार ठिकाणीं वाटतां कामा नये. एकवेळीं दोन गृहस्थ पुण्यास बोलताहेत व दोन लोणावळ्यास किंवा कल्याणास बोलत आहेत असें दाखवितां कामा नये. कारण वाचणारास किंवा पहाणारास एकदम दुसऱ्या ठिकाणीं नेतों असें सांगणें अम्मळ शोभत नाहीं, परंतु असें करण्यास फारशी हरकत आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कारण रंगभूमीवरचा पडदा खालीं सोडला, किंवा वाचकांनीं अम्मळ थांबलें, म्हणजे हवें तितकें लांब गेल्याची कल्पना करतां येईल.

काळाच्या संबंधानें आमचें हेंच म्हणणें आहे.) रंगभूमीवर तीन अथवा चार तास खेळ व्हावयाचा, तेवढ्या वेळांतच झालेली गोष्ट दाखवायाला पाहिजे असें नाहीं. पांच चार वर्षांतली किंवा पंचवीस वर्षांतली गोष्ट असली म्हणजे झालें. त्यांतील मुख्य मुख्य व चमत्कारिक भाग मात्र रंग

भूमीवर दाखविले पाहिजेत. बारिकसारिक सामान्य गोष्टींनीं पाहाणारांस आनंद होत नाहीं. एवढेंच आहे कीं पुष्कळ दिवस चाललेली गोष्ट तीन चार तासांत करून दाखविली तर विशोभित दिसेल म्हणून परिमित काळ पाहिजे. कृतयुगांत आरंभलेली व कलियुगांत संपलेली गोष्ट नाटकांत आणीन म्हटलें तर तें नाटक हास्यास्पद होईल. फार काय १०० वर्षे चाललेली गोष्ट एका नाटकांत आणली तर विलग दिसेल. अति झालें तर एक मनुष्याच्या जन्मापासून मरणापर्यंत झालेला वृत्तांत एका नाटकांत घातला असतां चालेल असें आमचें मत आहे.

वर सांगितलेल्या गुणांनीं युक्त नाटक असेल तर तें जगमान्य होईल ह्यांत संशय नाहीं. मराठीमध्यें नवीन झालेल्या नाटकांपैकीं 'माधवराव' 'नारायणराव' 'जयपाळ', झांशीची राणी, ह्यांमधून वर सांगितल्यापैकीं कांहीं गुण आहेत; व तेवढ्यापुरतें तीं मनोरंजन करितात. ह्यापैकीं 'माधवराव' नाटकांत रसाविर्भाव, सुंदर भाषा, विषयाची प्रौढी वगैरे गुण फार उत्तम साधले आहेत. परंतु संस्कृत नाटकांच्या भाषांतरांची गणना केली नाहीं, तर एकही उत्तम नाटक मराठीमध्यें अद्याप झालें नाहीं. असें कां? विद्वान उत्तरोत्तर होत चालले आहेत, परंतु कोणी मोठे विद्वान याविषयीं फारशी खटपट करित नाहींत. असें नसावें. सर्व प्रकारच्या सुधारणांमध्यें विद्वानांचा पुढें पाय आहे तर ही नाटककला व नावल लिहिण्याची शैली सुधारण्याकडेही त्यांनीं लक्ष द्यावें असें आम्हांस वाटतें. कोणी विचारील कीं नावलें व नाटकें चांगलीं लिहितां येऊन काय उपयोग आहे? नावलें व नाटकें लिहून मन रिझवणें ह्यापासून देशाची काय सुधारणा होणार आहे? त्या लोकांस आमचा असा प्रतिप्रश्न आहे कीं तुमचीं बायका मुलें, केवळ लिहितां वाचता येणारे चाकरचुकर, व तुमचे अल्पज्ञानी देशबांधव, ह्यांनीं आपला काळ कसा घालवावा? तीं तुमच्याबरोबर नाणीं, ताम्रपट, जुनीं लेणीं, जुन्या चाली रीति, जुनीं माणसें, व जुने लेख ह्यांचा शोध करित बसतील काय? तीं तुमच्याप्रमाणें मन म्हणजे अमुक, बुद्धि म्हणजे अमुक, आत्मा म्हणजे अमुक, ब्रह्म म्हणजे तमुक, असा विचार करित बसतील काय? तीं तुमच्याप्रमाणें मनुष्याच्या शरीरांत काय आहे, व इतर प्राण्यांच्या शरीरांत काय आहे, रक्ताभिसरण, श्वासोच्छ्वसन, अन्नपचन

Due Date

हीं कशीं होतात, प्राणवायूचे धर्म काय, धातूंचे धर्म काय, एकंदर मूल धर्म किती, अमुक वनस्पती किंवा प्राणी हीं कोणच्या वर्गांतलीं, अमुक खनिजाचे धर्म काय, पृथ्वीच्या पृष्ठभागाखालीं किती निरनिराळे थर आहेत, ह्या गोष्टींची चवकशी करित बसतील काय? कदाचित ताऱ्यांचीं नांवें माहित करून घेण्याची इच्छा होईल, पण त्यांचीं अंतरें, व त्यांचें विशिष्ट गुरुत्व घोकण्यास त्यांचा कल होईल काय? क्ष, य, काटकोन चौकोन, पराबोला हायपरबोला ह्यांपासून त्यास काय मौज वाटणार आहे असे अनेक प्रकारचे जे गूढ व क्लिष्ट उद्योग तुम्ही करितां, त्यांपासून त्यांस आनंद होणार आहे काय? कधीं नाहीं. त्यांचा काळ जाण्याला चमत्कारिक गोष्टीच पाहिजेत, आणि त्यांपासून त्यांचें हित व मनोरंजन हीं दोन्हीं व्हावीं अशी तुमची इच्छा असली तर स्वतः आपण कांहीं सुबोध गोष्टी व नाटकें रचावीं. अशी आमची विनंति आहे.'

S.N.D.T. WOMEN'S UNIVERSITY LIBRARY

Date Due

...SITY
LIBRARY

V 891·4609 (dup.) 29673
Mar/Nar

AUTHOR Marathe, Kashinath

TITLE Naval va Natak hyan vishayi nibandh

DATE DUE	BORROWER'S NAME

V 891·4604
Nar/Nav
29673